सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन



मा.ना.श्री. देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य



मा.ना.श्री. चंद्रशेखर बावनकुळे
मंत्री, ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा,
राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य



मा.ना.श्री. विजय देशमुख,
राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य, कामगार,
परिवहन व राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य

# ग्रामरक्षक दल

## माहिती पुस्तिका







आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

जुने जकात घर, दुसरा मजला, शहिद भगतसिंह मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१

# ग्रामरक्षक दल माहिती पुस्तिका

*

देवेंद्र फडणवीस
मुख्य मंत्री
महाराष्ट्र

सत्यमेव जयते

मंत्रालय
मुंबई-४०० ०३२
७ जून २०१७

# शुभेच्छा

अवैध मद्यविक्रीमुळे ग्रामीण भागात होणारे विविध अनुचित प्रकार रोखण्यासाठी गावपातळीवर स्थापन करण्यात येत असलेल्या ग्रामरक्षक दलाबाबतची माहिती पुस्तिका उत्पादन शुल्क विभागातर्फे प्रकाशित होत आहे, ही समाधानाची बाब आहे.

ग्रामीण भागातील अवैध मद्य निर्मिती व विक्री यावर प्रभावी नियंत्रण राखण्यासाठी गावातून स्थानिक पातळीवर प्रयत्न केले जावेत तसेच शासकीय यंत्रणेला सहाय्य व्हावे, यासाठी ग्रामरक्षक दलाची स्थापना करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या दलांमुळे शासनाच्या प्रयत्नांत लोकसहभाग लाभण्यास मदत होणार आहे. ग्रामरक्षक दल स्थापनेबाबत या पुस्तिकेतून संबंधितांना सविस्तर मार्गदर्शन होईल, असा विश्वास वाटतो.

उत्पादन शुल्क विभागाच्या सर्व उपक्रमांना मन:पूर्वक शुभेच्छा!

(देवेंद्र फडणवीस)

दूरध्वनी : ०२२-२२०२ ५१५१/२२०२ ५२२२, फॅक्स : ०२२-२२०२ ९२१४
ई-मेल : cm@maharashtra.gov.in, वेब साईट : www.maharashtra.gov.in

चंद्रशेखर बावनकुळे

सत्यमेव जयते

मंत्री
ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा,
राज्य उत्पादन शुल्क
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

# शुभ संदेश

जन सहभागातून केलेले कार्य चिरंतन राहते व त्याचे दिर्घकालीन चांगले परिणाम दिसून येतात. ही बाब आपणा सर्वांनाच ज्ञात आहे. अवैध मद्य निर्मिती व विक्री धंद्यावर लोक सहभागातून प्रभावीपणे नियंत्रण मिळावे व त्याचे समूळ उच्चाटन व्हावे म्हणून राज्य शासनाने महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ मधी कलम १३४ मध्ये दुरूस्ती करून ग्रामरक्षक दल स्थापनेची तरतूद केली आहे. सदर कायद्यातील तरतुदीची तात्काळ अंमलबजावणी व्हावी म्हणून समाजसुधारकांची आग्रही मागणी व स्वयंप्रेरणा यामुळे ग्रामरक्षक दल नियमावली २०१७ अल्प कालावधीत तयार केली आहे.

ग्रामरक्षक दल स्थापन करणेचा निर्णय संबंधित गावच्या ग्रामसभेत घ्यावयाचा आहे. सदर बाब ही बंधनकारक नाही. मात्र भविष्यात राज्यातील सर्व ग्रामपंचायत क्षेत्रात ग्रामरक्षक दल स्थापन होऊन अवैद्य दारू व अनुषांगिक गैरकृत्या विरूध्द एक व्यापक जनआंदोलन निर्माण करण्यात हा कायदा यशस्वी होईल याची मला खात्री आहे.

ग्रामिण भागात मद्यपींच्या गैरवर्तणुकीमुळे महिलांना होणारा त्रास, युवा पिढीच्या मनावर विपरीत होणारे परिणाम त्यामुळे समाजात असंतोष निर्माण झाला आहे. त्यावर उपाययोजना म्हणून शासकीय यंत्रणा व जन सहभागाच्या समन्वयाने अवैध मद्य निर्मिती व विक्री धंद्यावर प्रभावीपणे व गुणात्मक नियंत्रण राखण्यास शासन यशस्वी होईल, याची मला खात्री आहे.

ग्रामरक्षक दलासारखी नाविण्यपूर्ण संकल्पना व कायदा निर्माण करून महाराष्ट्र शासन देशात नेहमीच अग्रेसर राहील. ग्रामरक्षक दल स्थापनेस व त्याच्या माध्यमातून अवैध मद्य निर्मिती व विक्री धंद्यावर नियंत्रण मिळविण्यास माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा !

(चंद्रशेखर बावनकुळे)

कार्यालय :
दालन क्र. एम २०२, मध्यभाग, दुसरा माळा,
मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दूरध्वनी : ०२२-२२०२५३०८ / २२०२४५९२
Email : powerministry.mah@gmail.com
min.energy@maharashtra.gov.in

निवास :
"जेतवन" बंगला, एल. डी. रुपारेल मार्ग,
सह्याद्री राज्य शासकिय अतिथी गृहाजवळ,
मलबार हिल, मुंबई - ४०० ००६.
दूरध्वनी : ०२२-२३६३००९६ / २३६३४६६९

राज्यमंत्री
महाराष्ट्र राज्य

क्र.रा.मं./सा.आ./परि./काम./रा.उ.शु./भेट/ १८६/१७

राज्यमंत्री
सार्वजनिक आरोग्य, कामगार,
परिवहन व राज्य उत्पादन शुल्क
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in

दिनांक : 19 MAY 2017

## !! शुभ संदेश !!

ग्रामीण भागातील मद्यपींची वाढती संख्या व त्याचे समाजावर होणारे दुष्परिणाम तसेच मद्यपींच्या गैरवर्तणुकीमुळे महिलांना होणारा त्रास, युवा पिढीच्या मनावर होणारे परिणाम यावर उपाययोजना म्हणून शासकीय यंत्रणे सोबत जनसहभागाची साथ घेऊन अवैध मद्य निर्मिती व विक्री यावर प्रभावी नियंत्रण राखण्याच्या दृष्टीने शासनाने ग्रामरक्षक दल स्थापनेबाबत तरतूद केली असून त्यासाठी नियमावली सुध्दा तयार करण्यात आली आहे. ग्रामरक्षक दल स्थापनेबाबत असलेली तरतूद, ग्रामसभेने ठराव पारीत केल्यामुळे अथवा मतदारांनी निवेदन दिल्यामुळे अनुज्ञाप्ती बंद करण्याबाबतच्या तरतूदी, सार्वजनिक शांततेस बाधा आणणाऱ्या मद्यपीं विरुध्द करावयाच्या कारवाई विरुध्द परिपत्रकाद्वारे देण्यात आलेले निदेश याची जनतेला माहिती होणे गरजेचे असून या माहिती पुस्तिकेमध्ये या सर्व तरतूदींबाबत माहिती देण्यात आली असल्याने ३जनजागृती शक्य होणार आहे.

**ग्रामरक्षक दल स्थापनेस व त्यांच्या माध्यमातून अवैध मद्य निर्मिती व विक्री धंद्यावर नियंत्रण मिळविण्यासाठी माहिती पुस्तिकेद्वारे होत असलेल्या प्रयत्नास माझ्या मन:पूर्वक हार्दिक शुभेच्छा !**

(विजय देशमुख)

(नक्कल)

कि. बा. हजारे (अण्णा)
K. B. alias Anna Hazare

राळेगण सिद्धी, तालुका पारनेर,
जिल्हा अहमदनगर (महाराष्ट्र)
पिन ४१४३०२
☎ (०२४८८) २४०४०१ / २४०५८१
www.annahazare.org
www.joinannahazare.org.in

Ralegan Siddhi, Tal. Parner,
Dist. Ahmednagar (Maharashtra)
PIN 414302
☎ (02488) 240401 / 240581
annahazareoffice@gmail.com

# शुभ संदेश

महाराष्ट्र राज्यात दिवसेंदिवस महिलांवर वाढते अन्याय, अत्याचार, खेड्या-पाड्यातील होणारा शांततेचा भंग यामागे अनेक कारणे असली तरी वाढती व्यसनाधिनता हे एक प्रमुख कारण दिसून येते.

युवाशक्ती हे आमच्या देशाची राष्ट्रशक्ती आहे. समाज, राज्य, राष्ट्राचे भवितव्य युवकच घडू शकेल यावर आमचा विश्वास आहे. मात्र युवा शक्ती व्यसनाधिन होताना दिसते ही फार मोठी सामाजिक, राष्ट्रीय हानी होत आहे. महाराष्ट्र शासनाने अवैध मद्य निर्मितीला आळा बसावा म्हणून 1949 साली महाराष्ट्र दारुबंदी कायदा केलेला आहे.

कायद्याची अंमलबजावणी करुन अवैध मद्य निर्मितीला आळा घालण्याची जबाबदारी शासनाच्या काही खात्यावर सोपविलेली आहे. परंतू त्यांच्याकडे असणारी मनुष्यबळाची कमतरता किंवा इच्छाशक्तीचा अभाव यामुळे अवैध मद्य निर्मिती त्याचप्रमाणे खेड्यापाड्यात अवैध मद्य विक्रीला आळा घालण्यात अपेक्षित यश मिळत नाही. अवैध दारु निर्मितीला आणि विक्रीला आळा घालण्यासाठी शासनामधील ज्यांच्यावर जबाबदारी आहे अशा खात्याचे अधिकारी, कर्मचारी आणि जनता यांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. अशा हेतुने लोकशाही मार्गाने ग्राम रक्षक दल स्थापन करण्याची संकल्पना पुढे आली व शासनाने ती स्विकारली. या कायद्यानुसार ग्रामरक्षक दल हे शासनाकडून करण्यात येणार नाही तर त्या गावातील ग्रामसभेकडून करण्यात येणार आहे.

लोकशाही पद्धतीने ज्या गावचे लोक म्हणतात की आमच्या गावातील अवैध मद्य निर्मिती, विक्री बंद करण्यासाठी आम्हाला ग्राम रक्षक दल स्थापन करायचे आहे अशा गावात त्या गावच्या महिला ग्रामसभेने किंवा गावच्या सर्वसाधारण ग्रामसभेने किमान पंचवीस टक्के मतदारांच्या उपस्थितीत ग्राम रक्षक दलाची स्थापना करावयाची आहे. शासनाने दारू बंदी कायदा 1949 मधील कलम 134 मध्ये अधिक सुधारणा करुन ग्राम रक्षक दल स्थापन करण्याची कायदेशीर तरतूद केली आहे. लोकशाहीचा अर्थ लोकांची लोकांनी लोकसहभागातून चालवलेली लोकशाही असा असल्याने ग्रामरक्षक दलाची स्थापना लोकशाही मार्गाने ग्रामसभेच्या माध्यमातून होईल व शासन त्याला मान्यता देईल.

ग्रामरक्षक दल हा देशातील पहिला लोकशाही पद्धतीने केलेला कायदा असावा असे वाटते. आजपर्यंत सरकारच्या कामात लोकांचा सहभाग असे आपण म्हणत आलो. मात्र ग्रामरक्षक दल हा लोकांच्या कामात सरकारचा सहभाग असा कायदा झाला आहे. स्वातंत्र्य मिळाल्या बरोबर असा कायदा झाला असता तर अवैध दारु निर्मिती व विक्रीला आळा बसला असता. आज राज्यात अवैध दारुचे प्रमाण जे वाढले आहे, ते वाढले नसते.

या कायद्यात एक गोष्ट महत्वाची आहे, ती म्हणजे 26 जानेवारी 1950 साली देशात प्रजासत्ताक आले आहे आणि जनता या देशाची मालक झाली असून शासनातील सर्व अधिकारी, कर्मचारी हे जनतेचे सेवक आहेत. व्यवहाराप्रमाणे सेवक नेहमी मालकाला जबाबदार असायला हवेत. पण आजपर्यंत तसे झाले नाही. मात्र ग्रामरक्षक दलाच्या कायद्यामुळे संबंधित अधिकारी मालकरूपी ग्रामरक्षक दलाला जबाबदार धरण्यात आलेले आहेत. ग्रामरक्षक दलाने संबंधित अधिकाऱ्यांना अवैध दारु भट्टी किंवा अवैध दारु विक्री संबंधाने कळविल्यानंतर संबंधितांनी ताबडतोब त्यांच्यावर गुन्हे नोंद करायचे आहेत. विलंब केल्यास संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरुन कार्यवाही करण्याची तरतूद केलेली आहे. हा कायदा अधिक कठोर व्हावा यासाठी येत्या पावसाळी अधिवेशनामध्ये काही मुद्दे कायद्यात समाविष्ट करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

त्यामुळे संबंधित शासकीय अधिकारी, गावचे लोक, ग्रामपंचायत व ग्रामरक्षक दल हे हातात हात घालून या अवैध मद्य निर्मिती व विक्रीला आळा घालू शकतील. त्यामुळे सद्य स्थितीमध्ये खेड्यातील शांतता भंग होऊन कायदा सुव्यवस्थेला बाधा निर्माण होते त्याला आळा बसू शकेल असा विश्वास वाटतो. हा कायदा करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने पुढाकार घेऊन वेळोवेळी जे महत्त्वपूर्ण निर्णय घेतले त्याबद्दल जनतेच्या वतीने धन्यवाद.

कि. बा. तथा अण्णा हजारे

Sudhir Shrivastava, I.A.S.
सुधीर श्रीवास्तव, भा.प्र.से.
Additional Chief Secretary (Home)
अपर मुख्य सचिव (गृह)

सत्यमेव जयते

GOVERNMENT OF MAHARASHTRA
महाराष्ट्र शासन
HOME DEPARTMENT
गृह विभाग
Mantralaya, 2nd Floor,
मंत्रालय, दुसरा मजला,
Hutatma Rajguru Chowk,
हुतात्मा राजगुरु चौक,
Madam Cama Road, Mumbai 400 032
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.
Tel. : 22048130, Fax : 22026167
E-mail : acs.home@maharashtra.gov.in

Date :
दिनांक : १८ मे, २०१७

<u>शुभ संदेश</u>

ग्रामीण भागामध्ये विशेषत: युवापीढी मद्य प्राशनाच्या आहारी गेल्याचे दिसून येते. या मद्यपींच्या गैरवर्तणूकीमूळे महिलांना विशेषत: त्रास होत आहे व त्यामुळे सामाजिक स्वास्थ्यास बाधा निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होत आहेत. अवैध मद्य निर्मिती व विक्रीवर कारवाई करण्यासाठी महाराष्ट्र दारूबंदी कायदा अस्तित्वात आहे. परंतु, या अधिनियमाला अनुसरुन प्रशासकीय यंत्रणांनी केलेली कारवाई समाधानकारक दिसून येत नसल्यामुळे शासकीय यंत्रणेला स्थानिक जनसहभागाची साथ मिळावी म्हणून महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमामधे आवश्यक त्या सुधारणा करण्यात येऊन ग्राम रक्षक दल स्थापनेची तरतूद केली आहे. उक्त अधिनियमातील तरतूदींची प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी म्हणून महाराष्ट्र ग्राम रक्षक दल नियमावली, २०१७ तयार करण्यात आली आहे. उक्त अधिनियमातील दुरुस्ती व नियमावली तयार करण्यामध्ये माझा हातभार लागला याचे मला समाधान आहे.

अधिनियमातील सुधारणा व उक्त नियमातील तरतूदींना अनुसरुन ग्रामरक्षक दल स्थापन करण्यात ग्राम सभा व शासकीय यंत्रणा समन्वयाने काम करेल अशी अपेक्षा आहे. सबब, ग्राम रक्षक दलाच्या माध्यमातून त्या गावाच्या कार्यक्षेत्रातील अवैध मद्यनिर्मिती व विक्री बाबतची माहिती पोलीस व राज्य ऊत्पादन शुल्क विभागास प्राप्त होईल. सदर तक्रारीची / माहितीची दखल घेऊन शासकीय यंत्रणा विहित कालावधीत प्रभावीपणे कारवाई करतील अशी अपेक्षा आहे. अशा रितीने जनसामान्यांच्या सहभागातून अवैध मद्यविक्रीच्या धंद्यांवर नियंत्रण मिळविण्यात यश येईल व सामाजिक स्वास्थ अबाधित राखण्यास मदत होईल अशी मला खात्री आहे.

ग्राम रक्षक दल स्थापनेस व त्यांच्या उज्वल कामगीरीस माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा।

(सुधीर श्रीवास्तव)
अपर मुख्य सचिव (गृह)

महाराष्ट्र शासन
वल्सा नायर सिंग,
प्रधान सचिव, सा.प्र.वि.,
विमान चालन व रा.उ.शु.

## शुभ संदेश

ग्रामीण भागात विशेषत: युवापिढी मद्य प्राशनाच्या आहारी जाण्याचे दैनंदिन प्रमाण वाढत आहे. मद्यपींच्या गैरवर्तणुकीमुळे महिलांना त्रास होत आहे व त्यामुळे सामाजिक स्वास्थ्यास बाधा निर्माण होत आहे. अशावेळी सदरच्या परिस्थितीवर नियंत्रण आणणे अत्यावश्यक वाटते. त्यावर ठोस उपाययोजना करावयाची असा निर्धार करुन शासकीय यंत्रणेला स्थानिक जन सहभागाची साथ मिळावी याकरिता राज्य शासनाने महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ मधील कलम १३४ मध्ये सुधारणा करून ग्रामरक्षक दल स्थापनेबावत तरतुद केली आहे व त्याच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र ग्रामरक्षक दल नियमावली, २०१७ तयार केली आहे.

हा कायदा व नियमावलीला अनुसरून गावातील अवैध मदयनिर्मिती व विक्री बंद करण्यासाठी ग्रामरक्षक दल स्थापन होतील. महिलांची विशेष ग्रामसभा घेता येईल अशी नियमात तरतुद आहे. ग्रामरक्षक दल स्थापनेकरिता ग्रामसभा व शासकीय यंत्रणा समन्वयाने काम करील अशी अपेक्षा आहे. ग्रामरक्षक दलाच्या मार्फत शासकीय यंत्रणेला खात्रीशीर माहिती मिळाल्यानंतर शासकीय यंत्रणा तत्परतेने प्रतिसाद देऊन प्रभावीपणे कारवाई करेल अशी अपेक्षा आहे. सबब अवैध मद्य निर्मिती अगर विक्री धंद्यावर नियंत्रण येईल.

ग्रामरक्षक दल स्थापनेबाबतचा कायदा, नियमातील तरतुदी, अनुषंगिक निर्गमित केलेली परिपत्रके तसेच ग्रामसभा ठराव पारित केल्यामुळे अथवा मतदारांनी निवेदन दिल्यामुळे अनुज्ञप्ती बंद करण्याबाबतच्या तरतुदी इत्यादी माहितीचा समावेश असलेली पुस्तिका प्रसिध्द करताना मला आनंद होत आहे.

ग्रामरक्षक दल स्थापनेस व त्यांच्या कार्यास माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा !

वल्सा नायर सिंह

(वल्सा नायर सिंह)

डॉ. अश्विनी जोशी भा.प्र.से.
आयुक्त

आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय
जुने जकात घर, दुसरा मजला,
मुंबई ४०० ०२३
कार्यालय: (०२२) २२६४०८०२
फॅक्स : (०२२) २२६६ २३७०
ई-मेल : commstateexcise@gmail.com

# शुभ संदेश

अलिकडच्या काळात ग्रामीण भागात विशेषत: युवापिढीमध्ये मद्यप्राशनाचे प्रमाण वाढत आहे तसेच मद्यपींच्या गैरवर्तणुकीमुळे महिलांना त्रास होत असल्याचे व अनेकांचे संसार उध्वस्त होत असल्याचे वेळोवेळी निदर्शनास आलेले आहे. अशावेळी सदरच्या परिस्थितीवर नियंत्रण आणणे अत्यावश्यक वाटते. त्यावर ठोस उपाययोजना करावयाची असा निर्धार करुन शासकीय यंत्रणेला स्थानिक जन सहभागाची साथ मिळावी याकरिता राज्य शासनाने महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ मधील कलम १३४ मध्ये सुधारणा करून ग्रामरक्षक दल स्थापनेबाबत तरतुद केली आहे व त्याच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र ग्रामरक्षक दल नियमावली, २०१७ तयार केली आहे.

यापुढे महाराष्ट्र शासन याच ग्रामरक्षक दलाच्या माध्यमातून अवैध मद्याच्या निर्मिती व विक्रीवर प्रभावीपणे नियंत्रण करु शकेल असा मला विश्वास वाटतो. तसेच प्रत्येक गावामध्ये स्थापन करण्यात आलेल्या ग्रामरक्षक दलाच्या मार्फत शासकीय यंत्रणेला खात्रीशीर माहिती मिळाल्यानंतर शासकीय यंत्रणा तत्परतेने प्रतिसाद देऊन प्रभावीपणे कारवाई करेल. त्यामुळे अवैध मद्य निर्मिती अगर विक्री धंद्यावर नियंत्रण येईल. परिणामत: ग्रामिण भागातील समाजावर होणारे दुष्परिणाम, महिलांना होणारा त्रास व युवापिढीवर होणारे विपरीत परिणाम यातून त्यांची सुटका होईल अशी मला खात्री आहे.

ग्रामरक्षक दल स्थापनेस माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा !

(डॉ. अश्विनी जोशी)

# अनुक्रमणिका



| अनु. क्र. (१) | विषय (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| १ | ग्रामरक्षक दल अधिनियमातील तरतुदी | १ ते ३ |
| २ | ग्रामरक्षक दल नियम, २०१७<br>• ग्रामपंचायत आणि महिला मतदारांद्वारे अभिवेदन सादर करण्यासाठीची कार्यपद्धती<br>• महिला मतदारांच्या अर्जाची सत्यता पडताळणी<br>• ग्रामरक्षक दलाची स्थापना<br>• विशेष ग्रामसभे दरम्यान करावयाच्या उपाययोजना<br>• ग्रामरक्षक दल सदस्य, अध्यक्ष निवड, नियुक्ती, राजीनामा इ.बाबतची कार्यपद्धती<br>• सदस्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या<br>• ग्रामरक्षक दल मोहिमेचा आढावा | ४ ते १० |
| ३ | महाराष्ट्र ग्रामरक्षक दल (सुधारणा) नियम २०१७, अधिसूचना दि. ६ जून २०१७ | ११ ते १२ |
| ४ | अवैध दारू विक्री, निर्मिती व इतर संलग्न बाबी संदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत- शासन परिपत्रक दि. १ मार्च २०१७ | १३ ते १५ |
| ५ | अवैध मद्य विक्री, वाहतुक तसेच सार्वजनिक शांततेस बाधा आणणाऱ्या मद्यापी विरुद्ध करावयाच्या कारवाईबाबत–शासन परिपत्रक दि. १८ एप्रिल २०१७. | १६ ते १७ |
| ६ | अवैध दारु प्रतिबंधाबाबत आढावा घेण्यासाठी मा. मंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समिती गठित करण्याबाबत–शासन निर्णय दि. १६ मे २०१७ व ३ जून २०१७ | १८ ते २२ |
| ७ | ग्रामरक्षक दल स्थापना कालावधी व सदस्यांना ओळखपत्र देणेबाबत. शासन परिपत्रक दिनांक ६ जून २०१७ | २३ ते २४ |
| ८ | ग्रामसभा ठराव पारित केल्यामुळे अथवा नगर परिषद/महानगरपालिकेच्या वॉर्डातील मतदारांनी निवेदन दिल्यामुळे अनुज्ञप्ती बंद करावयाच्या कार्यवाहीबाबत-शासन राजपत्र दि. २५ मार्च २००८ | २५ ते २८ |
| ९ | मतदानाची वेळ वाढविल्याबाबत–शासन आदेश दि. ६ जून २०१७ | २९ ते ३० |
| १० | ग्रामिण भागात २५ऽ पेक्षा कमी नसलेल्या महिला मतदार किंवा एकूण तमदार यांनी मागणी केल्यावरुन मतदार यांनी मागणी केल्यावरुन मतदानाद्वारे मद्य विक्रीच्या अनुज्ञप्ती बंद करावयाच्या कार्यवाहीबाबत–शासन राजपत्र दि. १२ फेब्रुवारी २००९ | ३१ ते ३२ |
| ११ | मद्य विक्रीच्या अनुज्ञप्ती बंद करावयाच्या वेळी गुप्त मतदानासाठी मत पत्रिकेचा नमुना–शासन राजपत्र दि. १६ ऑगस्ट २०१६ | ३३ ते ३४ |
| १२ | राज्यातील सर्व अनुसुचित क्षेत्रातील गावामध्ये मद्य विक्रीची अनुज्ञप्ती देण्यापूर्वी ग्रामसभेचे मत घेणेबाबत–शासन राजपत्र दि. २८ ऑक्टोबर २०१४ व ४ मार्च २०१५ | ३५ ते ३८ |
| १३ | मद्य सेवन परवान्यावर देशी दारुच्या २ युनिट प्रति महिना बाळगणेबाबत–शासन अधिसुचना दि. २८ नोव्हेंबर २०१६ | ३९ |
| १४ | महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ मधील शिक्षेच्या तरतुदी | ४० ते ४१ |
| १५ | ग्रामरक्षक दल स्थापना, तक्रारी व अंमलबजावणी इ.च्या अनुषंगाने प्रश्नावली | ४२ ते ४५ |
| १६ | पोलीस व राज्य उत्पादन शुल्क विभागातील जिल्हा कार्यालयाचे दुरध्वनी क्रमांकाची यादी | ४७ ते ४९ |

RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ३, अंक १०(७)] सोमवार, जानेवारी १६, २०१७/पौष २६, शके १९३८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक २४

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका


| | पृष्ठे |
|---|---|
| सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९.—महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. | १-३ |


दिनांक १४ जानेवारी २०१७ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

प्रकाश हिं. माळी,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग.

---

**सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९.**

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक १६ जानेवारी २०१७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१९४९ चा २५. ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सदुसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र दारूबंदी (सुधारणा) अधिनियम, २०१६, असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा क्षेत्रात आणि अशा दिनांकास अंमलात येईल; आणि राज्याच्या वेगवेगळ्या क्षेत्रांसाठी वेगवेगळे दिनांक नियत करता येतील.

सन १९४९ चा अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम २ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या कलम २ मध्ये, खंड (१७) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— १९४९ २५.

"(१७अ) "ग्राम रक्षक दल " याचा अर्थ, कलम १३४अ अन्वये स्थापन केलेले ग्राम रक्षक दल असा आहे; ".

सन १९४९ चा अधिनियम क्रमांक २५ यामध्ये कलम १३४अ समाविष्ट करणे.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम १३४ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

ग्राम रक्षक दल स्थापन करणे.

"१३४अ. (१) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमान्वये घटित केलेल्या ग्राम पंचायतीस, ठरावाद्वारे किंवा ग्रामसभेच्या २५ टक्क्यांहून कमी नसतील इतक्या महिला मतदारांनी स्वाक्षरित केलेल्या अर्जाद्वारे, ग्राम रक्षक दलाची स्थापना करण्याच्या प्रयोजनार्थ, एक विशेष ग्राम सभा बोलवण्यासाठी, त्या क्षेत्राच्या उपविभागीय दंडाधिकाऱ्याला विनंती करता येईल. १९५९ ३.

(२) (अ) त्या क्षेत्राचा उपविभागीय दंडाधिकारी, पोट-कलम (१) अन्वये विनंती प्राप्त झाल्यावर, ग्रामसभेची अशी विशेष बैठक बोलावील.

(ब) पोट-कलम (१) अन्वये अर्जाचा नमुना, अर्ज सादर करण्याची पध्दत आणि अर्जदारांच्या खरेपणाच्या पडताळणीची रीत ही, विहित करण्यात येईल त्या प्रमाणे असेल.

(क) अशा ग्रामसभेची बैठक, त्या क्षेत्राच्या तहसीलदाराच्या उपस्थितीत आयोजित करण्यात येईल.

(ड) ग्रामसभेस, ग्राम रक्षक दलाचे सदस्य म्हणून नियुक्त करावयाच्या व्यक्तींची शिफारस करता येईल.

(इ) उप विभागीय दंडाधिकारी, ग्रामसभेच्या शिफारशीवरून, ग्राम रक्षक दल स्थापन करील.

(फ) अशा ग्राम रक्षक दलाच्या सदस्यांची मुदत दोन वर्षे इतकी असेल.

(३) ग्राम रक्षक दल हे, एखाद्या ग्रामपंचायतीचे जेवढे सदस्य असतील तितक्या सदस्यांनी मिळून बनलेले असेल, मात्र, त्यांची संख्या अकरापेक्षा अधिक असणार नाही.

(४) ग्राम रक्षक दलाचा सदस्य म्हणून नियुक्ती होण्यासाठीची पात्रता ही, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

(५) ग्राम रक्षक दलात महिलांचे आणि अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीतील व्यक्तींचे पुरेसे प्रतिनिधीत्व असेल.

(६) ग्राम रक्षक दलाचा प्रत्येक सदस्य, या अधिनियमाखालील कोणताही अपराध घडल्याबाबतची आणि कोणताही अपराध करण्याचा हेतू असल्याबाबतची किंवा तयारी करीत असल्याबाबतची त्याला कळेल अशी माहिती, ताबडतोब जवळच्या पोलीस ठाण्याला किंवा याबाबतीत प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याला किंवा व्यक्तीला देण्यास बांधील असेल.

(७) ग्राम रक्षक दलाच्या सदस्यांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या ह्या, विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम १४३ मधील पोट-कलम (२) मध्ये, खंड (डब्ल्यू) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील :— सन १९४९ चा अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम १४३ ची सुधारणा.

"(क्ष) कलम १३४अ च्या पोट-कलम (२) च्या खंड (ब) अन्वये अर्जाचा नमुना, अर्ज सादर करण्याची पद्धत आणि अर्जदारांच्या खरेपणाच्या पडताळणीची रीत विहित करणे ;

(य) कलम १३४अ च्या पोट-कलम (४) अन्वये ग्राम रक्षक दलाचा सदस्य म्हणून नियुक्तीसाठीची पात्रता विहित करणे ;

(ज्ञ) कलम १३४अ च्या पोट-कलम (७) अन्वये ग्राम रक्षक दलाच्या सदस्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या विहित करणे.".

RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ३, अंक ३०] बुधवार, मार्च २२, २०१७/चैत्र १, शके १९३९ [पृष्ठे १५, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ६३**

**प्राधिकृत प्रकाशन**

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ मार्च २०१७

### अधिसूचना

महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.

क्रमांक बीपीए. ०११७/प्र.क्र.२२/राउशु-३.—ज्याअर्थी, महाराष्ट्र ग्रामरक्षक दल नियम तयार करून ते तात्काळ अंमलात आणावेत असे महाराष्ट्र शासनास वाटले ; आणि म्हणून, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा २५) याच्या कलम १४३ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकात तरतूद केल्याप्रमाणे पूर्व प्रसिद्ध न करता हे नियम तयार करण्यात यावेत ;

त्याअर्थी, आता मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९ च्या कलम १४३ च्या पोट-कलम (३) मधील परंतुकाद्वारे, त्याचप्रमाणे पोट-कलम (२) चे खंड खंड (क्ष), (य) व (ज्ञ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे पुढील नियम करीत आहे :—

१. **संक्षिप्त नांव.**—या नियमांस, महाराष्ट्र ग्रामरक्षक दल नियम, २०१७ असे म्हणावे.

२. **व्याख्या.**—या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) "अधिनियम" याचा अर्थ, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा २५), असा आहे;

(ख) "अर्ज" याचा अर्थ, ग्रामसभेतील महिला मतदारांनी उप विभागीय दंडाधिकाऱ्यांकडे सादर केलेला अर्ज, असा आहे ;

(ग) "नमुना" याचा अर्थ, या नियमांना जोडलेले नमुने, असा आहे ;

(घ) "ग्राम सभा" याचा अर्थ, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३) याच्या कलम ३ च्या खंड (९) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे ग्रामसभा, असा आहे ;

(ङ) "ग्रामसेवक" याचा अर्थ, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ याच्या कलम ३ च्या पोट-कलम (२०) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे ग्राम पंचायतीचा ग्रामसेवक, असा आहे ;

(च) "उप-विभागीय दंडाधिकारी", "तहसीलदार" आणि "तलाठी" याचा अर्थ, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये उल्लेखित अधिकारी, असा आहे ;

(२) या नियमांत वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्द प्रयोगांना अधिनियमात अनुक्रमे नेमून दिल्याप्रमाणेच अर्थ असेल.

३. **ग्रामपंचायत आणि महिला मतदारांद्वारे अभिवेदन सादर करण्यासाठीची कार्यपद्धती.**—(१) कलम १३४ अ च्या पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, ग्रामपंचायतीने जर गावात ग्राम रक्षक दल स्थापन करण्याचा निर्णय घेतला असेल तर, ग्राम-पंचायत गावात ग्रामरक्षक दल स्थापन करण्याकरिता उप-विभागीय दंडाधिकाऱ्याकडे ग्रामसभेची विशेष बैठक घेण्यासाठी ग्रामपंचायतीने पारित केलेल्या ठरावाच्या प्रती सह, या नियमांना जोडलेल्या नमुना-क मध्ये अर्ज करील.

(२) जर गावातील महिलांनी, कलम १३४ अ च्या पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, गावात ग्रामरक्षक दल स्थापन करण्याचा निर्णय घेतला असेल तर, त्या गावात ग्रामरक्षक दल स्थापन करण्यासाठी उप विभागीय दंडाधिकाऱ्यांकडे विशेष ग्रामसभेची मागणी करण्याकरिता या नियमांना जोडलेल्या नमुना-ख मध्ये अर्ज करतील.

(३) ग्रामसेवक मिळालेला अर्ज उप विभागीय दंडाधिकाऱ्यांकडे अग्रेषित करील.

४. **उक्त नियम ३ (१) अन्वये अर्ज प्राप्त झाल्यावर उप-विभागीय दंडाधिकाऱ्याने ग्रामसभेची विशेष बैठक बोलावणे.**—(१) गावात ग्रामरक्षक दल स्थापन करण्यासाठी नियम ३ च्या उप-नियम (१) अन्वये अर्ज प्राप्त झाल्यावर, उप विभागीय दंडाधिकारी, तहसीलदारास एका महिन्याच्या आत त्या गावाच्या ग्रामसभेची विशेष बैठक बोलावण्याचे निदेश देईल.

(२) तहसीलदार, ग्रामपंचायतीशी विचार-विनिमय करून, विशेष ग्रामसभेच्या बैठकीची दिनांक व वेळ ठरवील.

(३) ग्रामसभेच्या विशेष बैठकीत, एकूण मतदाराच्या ५० टक्के पेक्षा अधिक मतदारांद्वारे ग्रामरक्षक दल स्थापन करण्याचा निर्णय घेतला असेल तर, ग्रामसभा, ग्रामरक्षक दलाच्या सदस्यांची निवड करील.

५. **महिला मतदारांच्या अर्जाची सत्यता पडताळणी.**— नियम ३ च्या उप-नियम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, उप विभागीय दंडाधिकाऱ्याला गावात ग्रामरक्षक दल स्थापन करण्यासाठी, महिला मतदारांद्वारे अर्ज प्राप्त होईल तेव्हा, उप-विभागीय दंडाधिकारी, तहसीलदाराला महिला मतदारांच्या स्वाक्षऱ्यांची पडताळणी करण्याचे निदेश देईल. तहसीलदार ग्रामसेवकाच्या आणि गावाच्या संबंधित तलाठ्याच्या मदतीने मतदार याद्यांमधील नावावरून अर्जावरील स्वाक्षऱ्या पडताळून पाहील. असे अर्ज, गावाच्या एकूण महिला मतदारांपैकी २५ टक्क्यांपेक्षा कमी नसतील इतक्या महिला मतदारांद्वारे सादर करण्यात आला आहे, या तथ्याची शहानिशा केल्यानंतर, तहसीलदार, उप-विभागीय दंडाधिकाऱ्याला पडताळणी अहवाल सादर करील.

६. **नियम ३ (२) अन्वये अर्ज प्राप्त झाल्यावर उप-विभागीय दंडाधिकाऱ्याने महिला ग्रामसभेची विशेष बैठक बोलावणे.**—(१) नियम ५ अन्वये तहसीलदाराचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर, जर पडताळणी अहवाल अनुकूल असेल तर, उप-विभागीय दंडाधिकारी, तहसीलदाराला, एक महिन्याच्या आत, त्या गावाच्या महिला ग्रामसभेची विशेष बैठक बोलावण्याचे निदेश देईल.

(२) तहसीलदार, ग्रामपंचायतीशी विचार-विनिमय करून, विशेष महिला ग्रामसभेचा दिनांक आणि वेळ ठरवील.

(३) महिलांच्या ग्रामसभेत जर एकूण महिला मतदारांपैकी ५० टक्क्यापेक्षा जास्त महिला मतदारांनी गावात ग्रामरक्षक दल स्थापन करण्याचा निर्णय घेतला असेल तर, महिला ग्रामसभा ग्रामरक्षक दलाच्या सदस्यांची निवड करील. जर ग्रामरक्षक दलाचे सदस्य म्हणून पुरुष सदस्यांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला असेल तर सदस्यांच्या संमतीची आवश्यकता असेल.

७. **ग्रामरक्षक दलाची स्थापना.**— (१) अशा ग्रामसभेचे व्हिडीओ प्रसंग चित्रण करण्यात येईल आणि अशा उक्त प्रसंग चित्रण साक्षीपुरावा म्हणून वापरण्यात येईल.

(२) नियम ४ व ६ मध्ये तरतूद केली असेल त्याप्रमाणे, विशेष ग्रामसभेत निवडण्यात आलेल्या ग्रामरक्षक दलाच्या अशा सदस्यांची नांवे आणि इतर तपशील, तहसीलदार, उप-विभागीय दंडाधिकाऱ्याला पाठवील.

(३) उप-विभागीय दंडाधिकारी, शिफारस केलेल्या सदस्यांचा पूर्वचरित्र अहवाल पोलीस ठाण्यातून मिळवील. उप-विभागीय दंडाधिकारी, निवडण्यात आलेल्या सदस्यांच्या संदर्भातील तपशील पडताळून पाहिल्यानंतर , गावात ग्रामरक्षक दल स्थापन करण्यासंबंधातील आदेश काढील.

(४) तहसीलदार, निवडण्यात आलेल्या ग्रामरक्षक दलाच्या सदस्यांना ओळखपत्र देईल. ओळखपत्र सदस्याचा पदावधी संपल्यावर परत करण्यात येतील.

८. **ग्रामसेवक आणि तलाठ्याची कर्तव्ये.**— ग्रामसेवक आणि तलाठी, ग्रामरक्षक दल स्थापन करण्यासाठी आणि या नियमांच्या प्रयोजनार्थ सर्व कामकाज पार पाडण्यासाठी तहसिलदाराला सहाय्य करतील.

९. **विशेष ग्रामसभेदरम्यान करावयाच्या उपाययोजना आणि घ्यावयाची काळजी.**—(१) विशेष ग्रामसभेसाठी जमा झालेल्या मतदारांची ओळख, त्यांची नावे मतदार यादीत असल्याचे सुनिश्चित करून पटविण्यात येईल आणि मगच त्यांना ग्रामसभेत प्रवेश दिला जाईल.

(२) त्या गावचा मतदार नसलेल्या कोणत्याही व्यक्तीस विशेष ग्रामसभेत प्रवेश दिला जाणार नाही.

(३) तहसीलदार, ग्रामसभेसमोर सभा बोलावण्यामागची कारणे मांडील आणि ग्रामरक्षक दलाच्या स्थापनेमागील अधिनियमाच्या तसेच नियमांच्या तरतुदींचा उद्देश स्पष्ट करील. तहसीलदार, मतदारांना ग्रामरक्षक दल स्थापन करण्यासाठी सदस्यांची नावे सुचवण्याच्या सूचना देईल.

१०. **ग्रामरक्षक दलाच्या सदस्यांच्या नियुक्तीसाठी पात्रतेचे निकष.**—(अ) ती व्यक्ती त्या गावची मतदार असली पाहिजे ;

(ब) त्या व्यक्तीने दारुबंदीच्या संदर्भात उल्लेखनीय कामगिरी केली असली पाहिजे ;

(क) ती व्यक्ती दारू न पिणारी असावी ;

(ड) ज्यात तीन वर्षांपेक्षा जास्त वर्षांच्या शिक्षेची तरतूद असेल असा, भारतीय दंड संहिता किंवा इतर कोणत्याही अधिनियमाखालील कोणताही गुन्हा, त्या व्यक्तीविरुध्द भूतकाळात नोंदवलेला नसला पाहिजे.

११. **ग्रामरक्षक दलाच्या सदस्यांची निवड.**— (१) ग्रामरक्षक दलाच्या एकूण सदस्यांची संख्या, त्या ग्रामपंचायतीच्या एकूण सदस्य संख्येइतकी असली पाहिजे, परंतु, कोणत्याही परिस्थितीत सदस्य संख्या अकरापेक्षा जास्त असता कामा नये.

(२) ग्रामरक्षक दलातील महिला सदस्यांची संख्या एकूण सदस्य संख्येच्या एक तृतीयांशापेक्षा कमी असता कामा नये.

(३) अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती प्रवर्गातील सदस्यांची संख्या ही गावाच्या लोकसंख्येतील अशा जाती आणि जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात असली पाहिजे. जर, या प्रवर्गातून योग्य सदस्य उपलब्ध झाला नाही तर इतर प्रवर्गातून सदस्य निवडता येतील.

१२. **ग्रामरक्षक दलाचा अध्यक्ष आणि सदस्य-सचिवाची निवड.**— (१) ग्रामरक्षक दलाच्या पहिल्या बैठकीत, सदस्यांमधून बहुमताच्या आधारे अध्यक्ष आणि सदस्य-सचिवाची निवड करण्यात येईल.

(२) अध्यक्ष, सदस्य-सचिव आणि सदस्यांचा पदावधी हा ग्रामरक्षक दलाच्या पदावधी इतकाच असेल.

(३) अध्यक्षास आपला राजीनामा सदस्य-सचिवास सादर करता येईल. सदस्य-सचिव आणि सदस्य यांना आपला राजीनामा अध्यक्षाकडे सादर करता येईल.

(४) ग्रामरक्षक दलाची बैठक तीन महिन्यांतून किमान एकदा बोलविण्यात येईल.

(५) जर ग्रामरक्षक दलाच्या सदस्यांनी अध्यक्षास पदावरून दूर करण्याची किंवा नवीन अध्यक्ष निवडण्याचा निर्णय घेतला असेल तर, त्यांना ग्रामरक्षक दलाची विशेष बैठक बोलावण्याची विनंती करणारा अर्ज तीनपेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांच्या सहीने सदस्य-सचिवाला सादर करता येईल. ग्रामरक्षक दलाचे सदस्य बहुमताच्या आधारे अध्यक्ष निवडतील.

(६) ग्रामरक्षक दलाच्या बैठकीचे कार्यवृत्त उप-विभागीय दंडाधिकाऱ्याला, पोलीस ठाण्यात आणि गावाचे अधिकारी असणाऱ्या राज्य उत्पादन शुल्क विभागास आणि ग्राम पंचायतीला पाठविणे अनिवार्य असेल.

(७) ग्रामरक्षक दलाचा सदस्य-सचिव, ग्रामरक्षक दलाच्या बैठकींच्या कार्यवृत्तांचा अभिलेख नमूना 'क' मध्ये ठेवील आणि ग्रामरक्षक दलाचा इतर अभिलेख ठेवील.

१३. **ग्रामरक्षक दलाची मुदत, पदावधी आणि नवीन सदस्याच्या नियुक्तीची व त्याच्या राजीनाम्याची कार्यपद्धती.**—(१) ग्रामरक्षक दलाची व त्याच्या सदस्यांची मुदत, आदेश निर्गमित केल्यापासून कार्यकाळ दोन वर्षांसाठी असेल.

(२) ग्रामरक्षक दलाच्या स्थापनेनंतर, जर ग्रामरक्षक दलाच्या कोणत्याही सदस्याला काढून टाकण्याची मागणी करण्यात आली असेल तर, एकूण मतदारांपैकी ५१ टक्के मतदारांनी किंवा एकूण महिला मतदारांपैकी ५१ टक्के इतक्या महिला मतदारांनी ठरावाच्या बाजूने मतदान केल्यास ग्रामसभेत ठराव मंजूर करून, अशा सदस्याला काढून टाकता येईल. हा ठराव उप-विभागीय दंडाधिकाऱ्याकडे पाठविण्यात येईल. उप-विभागीय दंडाधिकारी, अशा सदस्याला ग्रामरक्षक दलातून काढून टाकील.

(३) ग्रामरक्षक दलाच्या सदस्याला आपला राजीनामा, उप-विभागीय दंडाधिकाऱ्यांकडे सादर करता येईल व उप-विभागीय दंडाधिकारी, यथोचित पडताळणी केल्यानंतर सदर राजीनामा स्वीकारील.

(४) जर कोणताही सदस्य कोणत्याही अपराधामध्ये सिध्दापराधी ठरला असेल तर, तो ग्रामरक्षक दलाचा सदस्य असण्याचे आपोआप बंद होईल. सदस्य-सचिव, याबाबतची माहिती उप-विभागीय दंडाधिकाऱ्यास देईल.

(५) ग्रामरक्षक दलातील रिक्त पद, ग्रामसभेमध्ये बहुमताने ठराव मंजूर करून भरण्यात येईल. शिफारस केलेले नाव, उप-विभागीय दंडाधिकाऱ्याकडे पाठविण्यात येईल. उप-विभागीय दंडाधिकारी,अशा व्यक्तीची ग्रामरक्षक दलाचा सदस्य म्हणून नियुक्ती करील. नवीन सदस्याच्या नियुक्ती ग्रामरक्षक दलाच्या उर्वरित मुदतीकरिता करण्यात येईल.

(६) जर एखादा सदस्य पुरेशा कारणाशिवाय ग्रामरक्षक दलाच्या लागोपाठच्या तीन बैठकींना उपस्थित नसेल तर, सदस्य-सचिवास ग्रामरक्षक दलाचा सदस्य म्हणून अशा सदस्याला काढून टाकण्याची शिफारस, उप-विभागीय दंडाधिकाऱ्याकडे करता येईल. उप-विभागीय दंडाधिकारी, सदर कारणांबद्दल त्याची स्वतःची खात्री पटल्यानंतरच आणि त्या सदस्याला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतरच संबंधित सदस्याला काढून टाकण्याबाबत निर्णय घेईल.

**१४. ग्रामरक्षक दलाच्या सदस्यांची कर्तव्य व जबाबदाऱ्या**

ग्रामरक्षक दलाचे सदस्य,—

(अ) गावात बेकायदेशीरपणे दारू तयार करणे, त्याचे परिवहन करणे, जी जवळ बाळगणे व तिची विक्री करणे याविषयी, पोलीस आणि राज्य उत्पादन शुल्क विभाग यांना लेखी कळवतील ;

(ब) दारुच्या सेवनामुळे सार्वजनिक ठिकाणी उपद्रवास कारणीभूत ठरणाऱ्या आणि उपद्रव निर्माण करणाऱ्या लोकांना प्रतिबंध करतील, अशा व्यक्तींचे समुपदेशन करतील किंवा अशा व्यक्तींना ग्रामरक्षक दलाच्या किमान तीन सदस्यांच्या सहीने लेखी इशारा देतील ;

(क) व्यसनमुक्ती कार्यक्रमाचे आयोजन करतील, अशा लोकांना प्रबोधन करतील आणि मद्य रोगाच्या प्रतिकूल परिणामाविषयी जनजागृती निर्माण करतील ;

(ड) राज्य पोलीस विभागाच्या किंवा राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी कळविल्यानंतर कायदेशीर कार्यवाहीमध्ये सहकार्य करतील आणि खटल्याच्या वेळी पंच/साक्षीदार म्हणून उपस्थित राहतील ;

**१५. ग्रामरक्षक दल मोहिमेचा आढावा.**— (१) अवैध दारुच्या प्रतिबंधासाठी शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक : सीआरएम-२००४/६०८/पोल-११, दिनांक २३ डिसेंबर २००५ याद्वारे घटित केलेली तालुकास्तरीय समिती, ग्रामरक्षक दलांची त्रैमासिक आढावा बैठक बोलावील. अध्यक्ष व सदस्य-सचिव, अशा बैठकीस उपस्थित राहतील. तहसीलदार, पोलीस निरीक्षक व राज्य उत्पादन शुल्क अधिकारी, आढावा बैठकीत एकमेकांशी समन्वय साधतील आणि आपला अहवाल उप-विभागीय दंडाधिकाऱ्याला सादर करतील.

(२) सदस्य-सचिव, दारुबंदीबाबतच्या उपाययोजनांची नोंदवही ठेवील, अवैध/बेकायदेशीर दारुसंबंधीची माहिती गोळा करील, माहितीचे वर्गीकरण करील, अभिलेख ठेवील आणि अशी अन्य कामे करील.

नमुना-अ

[ नियम ३(१) पहा ]

ग्रामसभेने ग्रामरक्षक दलाची स्थापना करण्याबाबतचा अर्जाचा नमुना

प्रति,

मा. उप विभागीय दंडाधिकारी,

..................................................

जि. ..............................................

विषय : मौजे................ गाव, ता. ......................, जि. .................. येथे ग्रामरक्षक दल स्थापन करणे.

महोदय / महोदया,

वरील विषयाच्या संदर्भात, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा २५) याच्या कलम १३४-अ अन्वये ग्रामरक्षक दलाची स्थापना करण्यात यावी, अशी आपणास विनंती करण्यात येत आहे. आमच्या मौजे.............. या गावामध्ये अवैध दारु तयार करणे, तिची विक्री करणे यामध्ये वाढ झाली आहे. मद्यधुंद व्यक्तीचे असभ्य वर्तन आणि महिलांची छळवणूक यामुळे महिलांमध्ये सामाजिक असुरक्षिततेची भावना निर्माण होत आहे. म्हणून या गोष्टीस प्रतिबंध करण्याकरिता ग्रामसभेने ग्रामरक्षक दल नियम, २०१७ अन्वये ग्रामरक्षक दल स्थापना करण्याबाबतचा ठराव मंजूर केला आहे. ठरावाची प्रमाणीत यासोबत जोडली आहे.

आपला विश्वासू,

ग्रामसेवक सरपंच

सहपत्र : प्रस्तावित ग्रामरक्षक दलाच्या सदस्यांची नावे

| अ.क्र. (१) | संपूर्ण नाव (२) | पत्ता (३) | स्वाक्षरी (४) | जर अर्जदार अंगठ्याचा ठसा उमटवत असेल तर साक्षीदाराचे नाव व स्वाक्षरी (५) | शेरा (६) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

नमुना-ब

[ नियम ३(१) पहा ]

## महिला मतदारांनी, ग्रामरक्षक दलाची स्थापना करण्यासाठी विशेष ग्रामसभेची मागणी करण्याकरिता अर्जाचा नमुना

प्रति,

उप विभागीय दंडाधिकारी,

..........................................

जिल्हा ....................................

**विषय : ग्रामरक्षक दलाची स्थापना करण्याकरिता विशेष ग्रामसभेची मागणी करणे.**

माननीय महोदय / महोदया,

वरील विषयाच्या संदर्भात, आमच्या मौजे..........ता..............जि..............या गावात ग्रामरक्षक दलाची स्थापना करण्यासाठी विशेष ग्रामसभा असावी अशी आपणास विनंती करण्यात येत आहे. अवैध दारु तयार करणे व तिची विक्री करणे यामुळे मद्यधुंद व्यक्तींच्या गैरवर्तनात वाढ झाली असून, त्यातून महिलांची छळवणूक होण्याची समस्या निर्माण झाली आहे. यामुळे सामाजिक सुरक्षितता धोक्यात आली आहे. म्हणून या गोष्टीस प्रतिबंध करण्याकरिता महाराष्ट्र ग्रामरक्षक दल नियम, २०१७ अन्वये ग्रामरक्षक दलाची स्थापना करण्याकरिता ठराव मंजूर करण्यासाठी विशेष ग्रामसभा बोलावण्यात यावी. महिला मतदारांची यादी त्यांच्या स्वाक्षरीसह यासोबत जोडण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

ग्रामस्थांच्या स्वाक्षरी

| अ.क्र. | संपूर्ण नाव | पत्ता | स्वाक्षरी / अंगठ्याचा ठसा | अर्जदार अंगठ्याचा ठसा उठविल्यास साक्षीदाराचे नाव व स्वाक्षरी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | | | |

नमुना-क

[ नियम १४(ङ) पहा ]

ग्रामरक्षक दलाच्या सदस्यांचा अभिलेख

| अ.क्र. (१) | विषय (२) | उपस्थित सदस्यांची नावे (३) | कामकाजाचा तपशील (४) | सदस्यांची सही (५) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

पु. हि. वागदे,
शासनाचे सहसचिव.

RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ३, अंक ६८(५)] बुधवार, जून ७, २०१७/ज्येष्ठ १७, शके १९३९ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक १४९

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ जून २०१७

### अधिसूचना

महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.

क्रमांक बीपीए. ११७/प्र.क्र. २२/राउशु-३.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने असा विचार केला की, महाराष्ट्र ग्रामरक्षक दल नियम, २०१७ मधील खालील नियमामध्ये सुधारणा करण्यात येऊन, ताबडतोब अंमलात आणणे आवश्यक आहे, म्हणून हे नियम मुंबई दारुबंदी अधिनियम (१९४९ चा मुंबई २५) च्या कलम १४३ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकामधील तरतुदीनुसार आधी प्रसिद्ध न करता करण्यात यावे.

त्याअर्थी, आता, मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९ च्या कलम १४३ च्या पोट-कलम (३) मधील परंतुकाद्वारे त्याचप्रमाणे पोट-कलम (२) चे खंड (क्ष), (य), व (ज्ञ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे पुढील नियमात सुधारणा करीत आहे :—

१. या नियमांना महाराष्ट्र ग्रामरक्षक दल (सुधारणा) नियम, २०१७ असे संबोधण्यात यावे.

२. महाराष्ट्र ग्रामरक्षक दल नियम, २०१७ (यात यापुढे ज्याचा " प्रधान नियम " असा निर्देश करण्यात आला आहे) मधील नियम ४ मध्ये,

(*i*) उप नियम (३) मध्ये " ५० टक्के " या अंक आणि शब्दाऐवजी " २५ टक्के "असा अंक व शब्द समाविष्ट करण्यात यावा.

(*ii*) उप नियम (३) नंतर, खालील परंतूक समाविष्ट करण्यात येत आहे :—

जर का विशेष ग्रामसभेच्या बैठकीमध्ये, ग्रामरक्षक दल स्थापन करण्यात आले नाही तर, पुढील ग्रामसभेच्या बैठकीमध्ये ग्रामरक्षक दलाची स्थापना करण्यात येईल.

३. प्रधान नियमातील नियम ६ मध्ये,–

(i) " ५० टक्के " या अंक आणि शब्दाऐवजी " २५ टक्के " असा अंक व शब्द समाविष्ट करण्यात यावा.

(ii) उप नियम (३) नंतर, खालील परंतुक समाविष्ट करण्यात येत आहे :–

जर का विशेष महिला ग्रामसभेच्या बैठकीमध्ये, ग्रामरक्षक दल स्थापन करण्यात आले नाही तर, पुढील महिला ग्रामसभेच्या बैठकीमध्ये ग्रामरक्षक दलाची स्थापना करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

पु. हि. वागदे,
शासनाचे सह सचिव.

अवैध दारु विक्री, निर्मिती व इतर संलग्न
बाबींसदर्भात करावयाच्या कार्यवाही बाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः सीआरएम-२०१७/प्र.क्र. ७१/पोल-१३
दुसरा मजला, हुतात्मा राजगुरु चौक,
मादामा क़ामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०१ मार्च, २०१७

वाचा :-

१) शासन परिपत्रक क्रमांकः सीआरएम-२००४/प्र.क्र. ६०८/पोल-११, दिनांक ५ जुलै, २००४
२) शासन परिपत्रक क्रमांकः सीआरएम-२००८/प्र.क्र. १०१/पोल-११, दिनाक २ फेब्रुवारी, २००८

## शासन परिपत्रक

राज्यात अवैध दारु उत्पादन, वाहतूक व विक्री आढळून आल्यास अशा ठिकाणी अवैध धंद्याचे उच्चाटन करण्यासाठी करावयाच्या प्रतिबंधात्मक कार्यवाही संदर्भात उपरोक्त वाचा येथील शासन परिपत्रकान्वये या पूर्वी सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) अधिनियम, २०१६ (महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९/२०१७) शासन राजपत्रात दिनांक १६ जानेवारी, २०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे. या सुधारणा अन्वये ग्रामरक्षक दल स्थापित करण्याची तरतूद विहित करण्यात आली असून, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमातील तरतूदीनुसारचे गुन्ह्यांबाबतची माहिती नजीकचे पोलीस स्टेशन अथवा संबंधीत अधिकारी यांना ग्रामरक्षक दलाच्या सदस्याने देण्यासंदर्भातील तरतूद विहित करण्यात आली आहे, याकडे लक्ष वेधण्यात येत आहे. अवैध दारु धंद्यासंदर्भात करावयाच्या प्रतिबंधात्मक कार्यवाहीबाबत सर्व पोलीस घटक प्रमुख व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांना पुढील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. अवैध दारु उत्पादन व विक्री संदर्भात माहिती मिळताच त्वरित अशा प्रकरणात कार्यवाही करुन गुन्हे दाखल करण्यात यावेत. यामध्ये अवैध दारुच्या निर्मिती, विक्री यामध्ये गुंतलेल्यांच्या बरोबरच ज्या प्रकरणी अशा अवैध दारुची निर्मिती होत आहे अशा जागेच्या मालकाचा सक्रिय सहभाग आहे, असे आढळून आल्यास त्यांच्या विरुध्द देखील कायद्याच्या प्रचलित तरतूदीनुसार गुन्हे दाखल करण्यात यावेत.
२. अवैध दारु उत्पादन व विक्रीच्या ठिकाणी वेळोवेळी धाडी टाकून कारवाई करण्यात यावी. या कारवाईमध्ये जप्त करण्यात आलेला माल व साहित्य कायदयानुसार नाश करण्यात यावे. सदर कारवाई वेळी ज्या-ज्या ठिकाणी ग्राम रक्षक दल स्थापित झाले आहेत, त्या-त्या ठिकाणी

ग्राम रक्षक दलाचे दोन सदस्य साक्षीदार म्हणून, शक्यतो, घेण्यात यावेत. तसेच, सदरची अवैध दारु कोठून व कोणत्या मार्गाने आणली याबाबत तपासी अधिकारी यांनी सत्वर शोध घ्यावा.

३. अवैध दारुची विक्री व निर्मिती करणाऱ्या व्यक्तीस (Ring Operators/Financial Beneficiaries) अटक करुन त्याच्याविरुध्द ३ पेक्षा जास्त वेळेस कारवाई झाली असेल तर त्यांच्याविरुध्द महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये हद्दपार तसेच **"महाराष्ट्र प्रिव्हेन्शन ऑफ डेंजरस ॲक्टीव्हीटीज ऑफ स्लमलॉर्डस, बुटलेगर्स ॲन्ड ड्रग ऑफेन्डर्स ॲक्ट १९८१ प्रमाणे कारवाई करण्यात यावी."** सदरची कार्यवाही ही कालबध्द स्वरुपात होईल याकडे पोलीस घटक प्रमुख यांनी विशेषत्वाने लक्ष द्यावे.

४. अवैध दारु धंद्यावर निर्बंध आणण्याच्या दृष्टीने पोलीस विभाग आणि राज्य उत्पादन शुल्क विभाग यांनी एकत्रितपणे कार्यवाही करण्यासाठी बैठका घेण्यात याव्यात. तसेच, दोन्ही विभागांनी स्वतंत्रपणे केलेल्या कार्यवाहीची माहिती एकमेकांना द्यावी व अशा कार्यवाहीसाठी पोलीस आयुक्त यांनी आयुक्तालय स्तरावर आणि पोलीस अधीक्षक यांनी जिल्हास्तरावर संयुक्त पथके स्थापन करावीत.

५. अवैध दारुधंद्यावर प्रभावी कार्यवाही करण्याच्या दृष्टीने पोलीस विभाग आणि राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकाऱ्यांची बैठक दरमहा पोलीस आयुक्त व पोलीस अधीक्षक यांनी घ्यावी व या बैठकीमध्ये करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्यात यावा तसेच, परिणामकारक निर्बंध आणण्याच्या दृष्टीने करावयाच्या उपाययोजनांबाबत कृती कार्यक्रम निश्चित करावा.

६. अवैध धंद्यांबाबत जनेतकडून तक्रारी प्राप्त झाल्यास तक्रारदाराचे नाव गुप्त राहिल याबाबत आवश्यक दक्षता घेण्यात यावी. तसेच, अशा तक्रारी संदर्भात गुप्त चौकशी करुन वेळोवेळी आवश्यक कारवाई करण्यात यावी.

७. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक /सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप अधीक्षक /उप विभागयी पोलीस अधिकारी यांनी त्यांच्या पोलीस ठाण्याच्या तसेच, राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने त्यांच्या अधिनस्त कार्यालयाच्या नेहमीच्या भेटीच्या वेळी अवैध धंद्याबाबत किती तक्रारी आल्या, त्यावर काय कार्यवाही झाली, पूर्वी ज्या ठिकाणी धाडी टाकण्यात आल्या होत्या त्या ठिकाणी पुन्हा धंदे सुरु आहेत किंवा कसे याची माहिती घ्यावी व आवश्यक असल्यास पुन्हा कार्यवाही करावी.

८. आयुक्तालयात/जिल्ह्यात कोठेही अवैध दारुधंदे चालु नाहीत याची खात्री करावी. तसेच, भविष्यातही अशा प्रकारचे धंदे त्यांच्या हद्दीत चालणार नाहीत, याकरीता आवश्यक दक्षता घेण्यात यावी.

९. ग्राम रक्षक दलाने केलेल्या तक्रारीची दखल तातडीने घेण्यात यावी. सदर तक्रारीची योग्य दखल न घेतल्याचे आढळल्यास तसेच, ज्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत किंवा राज्य उत्पादन शुल्क अधिकाऱ्याच्या कार्यक्षेत्रात अवैध दारुधंदे सुरु असल्याचे आढळल्यास त्या संबंधीत अधिकाऱ्यांवर कर्तव्यात कसुर केल्याबद्दल प्रचलित नियमानुसार कठोर शिस्तभंग विषयक

कार्यवाही होईल, याबाबत पोलीस घटक प्रमुख/जिल्हा अधीक्षक, रा.ऊ.शु. यांनी आवश्यक दक्षता घ्यावी.

१०. दारु पिऊन शांतता भंग करणारे व गुन्हेगारी कृत्य करणाऱ्या सराईत व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाच्या कलम ९३ अन्वये चांगल्या वर्तणूकीचे हमीपत्र संबंधीत व्यक्तीकडून घेण्याबाबत कायद्यातील प्रचलित तरतूदीनुसार आवश्यक कार्यवाही करण्यात यावी. तसेच, सराईत गुन्हेगार व्यक्तीविरुध्द कायदयाच्या तरतूदीनुसार महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलमानुसार हद्दपारी ची आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

११. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ अंतर्गत कलम ९३ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम च्या कलम ५५, ५६, ५७ ची प्रकरणे दिर्घकाळ प्रलंबित राहतात, असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. सबब, सर्व जिल्हादंडाधिकारी यांना कळविण्यात येत की, अशा प्रकरणांची निर्गती कालबध्द स्वरुपात होईल याकडे लक्ष द्यावे. तसेच, सदर प्रकरणे दिर्घकाल प्रलंबित राहिल्यास संबंधितांविरुध्द जिल्हादंडाधिकारी यांनी प्रशासकीय कार्यवाही करावी.

सदर परिपत्रकातील सूचनां सर्व पोलीस घटक प्रमुख यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व पोलीस ठाणे प्रमुख यांच्या तसेच अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांनी त्यांच्या अधिपत्या खालील निरीक्षकांच्या निर्दशनास आणून याची अंमलबजावणी योग्य रीतीने होईल याकडे परिपूर्ण लक्ष देऊन कार्यवाही करावी.

सदर परिपत्रक राज्य उत्पादन शुल्क प्रभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१७०२२८१९०६४५२७२९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Yuvraj B Ajetrao

Digitally signed by Yuvraj B Ajetrao
DN: CN = Yuvraj B Ajetrao, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Home Department
Date: 2017.03.01 11:37:19 +05'30'

युवराज ब. अजेटराव
उप सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

ग्रामरक्षक दल नियम, २०१७ अनुसार अवैध मद्य विक्री, वाहतूक तसेच सार्वजनिक शांततेस बाधा आणणाऱ्या मद्यपिंविरूध्द करावयाच्या कार्यवाहीबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग,
शासन परिपत्रक, क्रमांक:बीपीए-०११७/प्र.क्र.२२/राउशु-३,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १८ एप्रिल, २०१७.

परिपत्रक:-

राज्यात अवैध दारु उत्पादन, वाहतूक व विक्री आढळून आल्यास अशा ठिकाणी अवैध धंद्याचे उच्चाटन करण्यासाठी करावयाच्या प्रतिबंधात्मक कार्यवाही शासनस्तरावरून वेळोवेळी सूचना देण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) अधिनियम, २०१६ (महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९/२०१७) शासन राजपत्रात दिनांक १६ जानेवारी, २०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे.त्यानुसार ग्रामस्तरावर ग्रामरक्षक दल स्थापन करण्याबाबत ग्रामरक्षक दल नियम, २०१७ शासन अधिसूचना, दि.२२ मार्च, २०१७ अन्वये प्रसिध्द केले आहेत.

२. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमातील तरतूदीनुसारचे अवैध मद्य विक्री, बाळगणे, वाहतूक करणे इ. गुन्ह्यांबाबतची माहिती नजीकचे पोलीस स्टेशन अथवा संबंधीत अधिकारी यांना ग्रामरक्षक दलाच्या सदस्याने देण्यासंदर्भातील तरतूद विहित करण्यात आली असून त्यानुसार अधिकारी / कर्मचारी यांनी करावयाच्या कार्यवाहीसंदर्भात पुढील प्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

१) अवैध दारु उत्पादन व विक्री संदर्भात ग्रामरक्षक दलाकडून माहिती मिळताच पोलीस विभाग / राज्य उत्पादन शुल्क विभागाने १२ तासाच्या आत कार्यवाही करुन गुन्हे दाखल करण्यात यावेत.

२) दारु पिऊन गावात गोंधळ घालणाऱ्या, मारामाऱ्या करणाऱ्या इसमांबाबत ग्रामरक्षक दलाकडून संबंधित अधिकाऱ्यांना कळविल्यानंतर मद्यपान केलेल्या इसमांस नशा असेपर्यंत शक्य तितक्या लवकर ताब्यात घेवून त्याची प्रथमत: वैद्यकीय तपासणी करून महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ च्या कलम ८५ नुसार त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी.

३) दारुविषयी गुन्हेगारी कृत्य करणाऱ्या सराईत व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाच्या कलम ९३ अन्वये चांगल्या वर्तणूकीचे हमीपत्र संबंधीत व्यक्तीकडून घेण्याबाबत कायद्यातील प्रचलित तरतूदीनुसार आवश्यक कार्यवाही करण्यात यावी. तसेच, सराईत गुन्हेगार व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलमानुसार हद्दपारीची आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

४) अवैध मद्य निर्मिती व विक्री व्यवसाय करणाऱ्या इसमांवर तीन वेळापेक्षा जास्त गुन्हे नोंदविण्यात आल्यास व शिक्षा झाल्यास अशा इसमांवर हद्दपारीचा प्रस्तावासाठी पोलीस विभागाने कालमर्यादा विहित करावी. अशा कालमर्यादेत प्रस्ताव सादर न केल्यास संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्यावर कर्तव्यात कसुरीबाबत प्रशासकीय कारवाई करावी.

५) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने व्यसनमुक्ती धोरणानुसार शैक्षणिक संस्था, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात व्यसनांच्या दुष्परिणामांची माहिती समाविष्ट करणेबाबत कार्यवाही करावी. तसेच पोलीस विभाग व राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या सहाय्याने जनतेत जागृती करण्यासाठी चित्रफीत, जाहिरात, लोककला, पथनाटय, नभोवाणी व दूरदर्शनद्वारे इ. माध्यमातून व्यसनमुक्तीचा प्रचार व प्रसार करावा.

४. सदर परिपत्रकातील सूचनां सर्व पोलीस घटक प्रमुख यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व पोलीस ठाणे प्रमुख यांच्या तसेच अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांनी त्यांच्या अधिपत्या खालील निरीक्षकांच्या निर्दशनास आणून याची अंमलबजावणी योग्य रीतीने होईल याकडे परिपूर्ण लक्ष देऊन कार्यवाही करावी.

५. सदर परिपत्रक गृह विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१७०४१८१७३८१७१२२९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

७. महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Punam Hiraman Wagde

Digitally signed by Punam Hiraman Wagde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=36d7295f0f289d96eecb9e12c2650ebd4f894edc0ea09f60a3c1361513a6bf87, cn=Punam Hiraman Wagde
Date: 2017.04.18 18:02:55 +05'30'

(पु. हि. वागदे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
२. मा.मंत्री, राउशु यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.राज्यमंत्री, राउशु यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. अपर मुख्य सचिव (गृह), राज्य उत्पादन शुल्क, मंत्रालय, मुंबई,
५. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
६. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई
८. आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क विभाग,
९. सर्व विशेष पोलीस महानिरीक्षक
१०.सर्व जिल्हाधिकारी/जिल्हा दंडाधिकारी
११.सर्व पोलीस आयुक्त/पोलीस अधीक्षक
१२.सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क
१३.सर्व सह सचिव / उप सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
१४.निवड नस्ती (राउशु-३)

**अवैध दारुस प्रतिबंध घालण्यासाठी मा.मंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांचे अध्यक्षेखाली राज्यस्तरीय समिती गठीत करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग,**
शासन निर्णय, क्रमांक:एमआयएस-०३१७/प्र.क्र.१०४/राउशु-३,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १६ मे, २०१७.

वाचा :- १) शासन परिपत्रक, क्रमांक सीआरएम २००४/६०८/पोल-११, दिनांक २३ फेब्रुवारी,२००५.

२) शासन परिपत्रक क्रमांक सीआरएम २०१७/प्र.क्र.७१/पोल-१३, दिनांक १ मार्च,२०१७.

**प्रस्तावना :-**

राज्यात अवैध दारु निर्मिती, वाहतुक व विक्रीला आळा घालण्यासाठी शासनाने वेळोवेळी क्षेत्रीय यंत्रणेला सूचना केल्या आहेत. परंतु, शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, सूचनेची काटेकोरपणे अंमलबजावणी होत नाही. यामुळे शासन स्तरावरुन देण्यात आलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन होते की नाही, अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी परिणामकारक उपाययोजनांची आखणी करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) अधिनियम,२०१६ नुसार ग्रामपंचायत स्तरावर अवैध मद्यनिर्मिती, विक्री व वाहतुक यावर प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी ग्रामरक्षक दलाची स्थापना करण्यात आली आहे. यासंदर्भात अवैध दारुस प्रतिबंध घालण्यासाठी ग्रामस्तर ते राज्यस्तरापर्यन्त वेळोवेळी आढावा घेणे आवश्यक आहे.

**शासन निर्णय :**

अवैध दारु धंद्यासंदर्भात पोलीस प्रशासन व राज्य उत्पादन शुल्क यांनी एकत्रितपणेकरावयाच्या प्रतिबंधात्मक कार्यवाहीबाबत सूचना देण्यात आल्याआहेत. यासंदर्भात ग्रामस्तरापासून राज्यस्तरापर्यन्त करण्यात आलेल्या कार्यवाहीचाआढावा घेण्यासाठी मा.मंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांच्या अध्यक्षतेखालीअवैध दारुस प्रतिबंध घालण्यासाठी राज्यस्तरीय समिती गठीत करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

**राज्यस्तरीयसमितीची रचना :**

| अ.क्र. | नांव | पद |
|---|---|---|
| १ | मा.मंत्री (राज्य उत्पादन शुल्क) | अध्यक्ष |
| २ | मा.मंत्री (सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती) | सदस्य |
| ३ | मा.राज्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क) | सदस्य |
| ४ | मा.राज्यमंत्री (सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती) | सदस्य |
| ५ | व्यसनमुक्ती संस्थांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ६ | व्यसनमुक्ती संस्थांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ७ | महिला संघटनांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ८ | महिला संघटनांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ९ | महिला संघटनांचे प्रतिनिधी | सदस्य |
| १० | प्रधान सचिव, गृहविभाग (विशेष) | सदस्य |
| ११ | प्रधान सचिव, वित्त विभाग | पदसिध्द सदस्य |
| १२ | प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव (राज्य उत्पादन शुल्क) | सदस्य |
| १३ | प्रधान सचिव ,सार्वजनिक आरोग्य विभाग | सदस्य |
| १४ | सचिव/प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | सदस्य |
| १५ | सचिव/प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग | सदस्य |
| १६ | पोलीस महासंचालक | सदस्य |
| १७ | आरोग्य संचालक | सदस्य |
| १८ | आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क | सदस्य सचिव |

**समितीची कार्यकक्षा :**

१) अवैध दारु उत्पादन व विक्री संदर्भात पोलीस विभाग आणि राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणे.

२) ग्रामस्तरावर स्थापन करण्यात आलेल्या ग्रामरक्षक दलाच्या कामाचा आढावा घेणे.

३) अवैध दारुधंदयावर परिणामकारक नियंत्रण ठेवण्यासाठी उपाययोजना सुचविणे व त्यानुसार कृती कार्यक्रम निश्चित करणे.

**समितीची बैठक सहा महिन्यातून एकदा आयोजित करण्यात यावी.**

**जिल्हास्तरिय समितीची रचना :**

| अ.क्र. | नांव | पद |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | जिल्हा पोलीस अधीक्षक | कार्यकारी अध्यक्ष |
| ३ | मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद | सदस्य |
| ४ | जिल्हा परिषदेच्या महिला सदस्य | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ५ | जिल्हा परिषदेच्या महिला सदस्य | सदस्य |
| ६ | स्वयंसेवी संस्थाचा प्रतिनिधी | सदस्य |
| ७ | स्वयंसेवी संस्थाचा प्रतिनिधी | सदस्य |
| ८ | अनुसूचित जाती , महिला सदस्य | सदस्य |
| ९ | अनुसूचित जमाती, महिला सदस्य | सदस्य |
| १० | व्यसनमुक्ती संस्थांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ११ | व्यसनमुक्ती संस्थांचे प्रतिनिधी | सदस्य |
| १२ | जिल्हा पोलीस अधीक्षक | सदस्य |
| १३ | विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी | पदसिध्द सदस्य |
| १४ | जिल्हा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क | सदस्य सचिव |

<u>जिल्हास्तरिय समितीची कार्यकक्षा</u> :

१) अवैध दारु उत्पादन व विक्री संदर्भात जिल्हयांतर्गत दाखल करण्यात आलेल्या गुन्हयांचा आढावा घेणे.

२) पोलीस विभाग आणि राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणे.

३) ग्रामस्तरावर स्थापन करण्यात आलेल्या ग्रामरक्षक दलाच्या कामाचा आढावा घेणे.

४) महाराष्ट्र पोलीस अधिनियमान्वये हद्दपार तसेच महाराष्ट्र प्रिव्हेन्शन ऑफ डेंजरस ॲक्टीव्हीटीज ऑफ स्मलर्लॉर्डस, बुटलेगर्स ॲन्ड ऑफेन्डर्स ॲक्ट १९८१ प्रमाणे केलेल्या कारवाईचा आढावा घेणे.

५) पोलीस अधीक्षक यांनी जिल्हास्तरावर अवैध दारु धंदयावर निर्बंध आणण्याच्या दृष्टीने पोलीस विभाग आणि राज्य उत्पादन शुल्क यांनी एकत्रितपणे कार्यवाही करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या संयुक्त पथकांच्या कामगिरीचा आढावा घेणे.

६) दारु पिऊन शांतता भंग करणारे, गुन्हेगारी कृत्य करणाऱ्या सराईत व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ९३ अन्वये केलेल्या कार्यवाहीचा व महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम ५५, ५६ व ५७ नुसार प्रलंबित प्रकरणासंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणे.

७) अवैध दारुधंदयावर परिणामकारक नियंत्रण ठेवण्यासाठी उपाययोजना सुचविणे व त्यानुसार कृती कार्यक्रम निश्चित करणे.

८) अवैध दारु निर्मिती व विक्रीस प्रतिबंध घालण्यासाठी तालुकास्तरावर तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीच्या कामगिरीचा आढावा घेणे.

जिल्हास्तरीय समितीची बैठक तीन महिन्यातून एकदा घेण्यात यावी. तसेच आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांचे कार्यालयातील उप आयुक्त स्तरावरील अधिकाऱ्याकडे याबाबतचा कार्यभार सोपविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inयासंकेत स्थळावर उपलब्ध केला असून, त्याचा संकेतांक क्रमांक असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( पु.हि.वागदे )
सह सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई,
२) मा.मंत्री (सामाजिक न्याय/राज्य उत्पादन शुल्क) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) मा.राज्यमंत्री (सामाजिक न्याय/राज्य उत्पादन शुल्क) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
५) सर्व अपर मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
६) सर्व प्रधान सचिव/सचिव (सर्व मंत्रालयीन विभाग), मंत्रालय, मुंबई,
७) सचिव,सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभाग यांचे वरीष्ठ स्वीय सहायक,
८) आयुक्त,समाजकल्याण, पुणे
९) सर्व विभागीय आयुक्त,
१०) सर्व जिल्हाधिकारी,
११) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१२) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई,
१३) सर्व पोलीस आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१४) सर्व पोलीस अधीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१५) सर्व जिल्ह समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,
१६) निवड नस्ती.

अवैध दारुस प्रतिबंधाबाबत आढावा घेण्यासाठी मा.मंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांचे अध्यक्षतेखाली <u>गठीत राज्यस्तरीय समितीमधील सुधारणेबाबत.</u>

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक : एमआयएस-०३१७/प्र.क्र.१०४/राउशु-३,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ०३ जून, २०१७.

<u>वाचा</u> :- शासन निर्णय, समक्रमांक दि.१६ मे, २०१७.

<u>शासन निर्णय</u> :-

अवैध दारु धंद्यासंदर्भात पोलीस प्रशासन व राज्य उत्पादन शुल्क यांनी एकत्रितपणे करावयाच्या प्रतिबंधात्मक कार्यवाहीचा आढावा घेण्यासाठी मा.मंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांच्या अध्यक्षतेखाली अवैध दारुस प्रतिबंध घालण्यासाठी राज्यस्तरीय समिती गठीत व जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीची गठीत करण्यास संदर्भाधीन शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

२. ग्रामरक्षक दलांस प्रतिनिधीत्व देण्याच्या अनुषंगाने राज्यस्तरीय समिती व जिल्हास्तरीय समितीमध्ये ग्रामरक्षक दलातील ६ सदस्य निमंत्रित सदस्य राहतील.

३. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीच्या रचनेमध्ये क्र.१२ येथील जिल्हा पोलीस अधीक्षक ऐवजी पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय) अशी सुधारणा करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध केला असून, त्याचा संकेतांक क्रमांक २०१७०६०३१२२५५८०१२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Punam Hiraman Wagde

Digitally signed by Punam Hiraman Wagde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=26d7295f0f289d96eecb9e12c2850ebd4894edd0ea69760e3c156151 5a6b87, cn=Punam Hiraman Wagde
Date: 2017.06.03 12:24:31 +05'30'

(पु. हि. वागदे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
२) मा.मंत्री (सामाजिक न्याय/राज्य उत्पादन शुल्क) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.राज्यमंत्री (सामाजिक न्याय/राज्य उत्पादन शुल्क) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
५) सर्व अपर मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
६) सर्व प्रधान सचिव/सचिव (सर्व मंत्रालयीन विभाग), मंत्रालय, मुंबई.
७) सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभाग यांचे वरीष्ठ स्वीय सहायक.

ग्रामरक्षक दल नियम, २०१७ अनुसार
ग्रामरक्षक दल स्थापनेच्या अनुषंगाने
<u>करावयाच्या कार्यवाहीबाबत.</u>

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : बीपीए-०११७/प्र.क्र.२२/राउशु-३,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :-०६ जून, २०१७.

## <u>शासन परिपत्रक</u>

राज्यात अवैध दारु उत्पादन, वाहतूक व विक्री आढळून आल्यास अशा ठिकाणी अवैध धंद्याचे उच्चाटन करण्यासाठी करावयाच्या प्रतिबंधात्मक कार्यवाही शासनस्तरावरून वेळोवेळी सूचना देण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) अधिनियम, २०१६ (महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९/२०१७) शासन राजपत्रात दिनांक १६ जानेवारी, २०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे. त्यानुसार शासन अधिसूचना, दि.२२ मार्च, २०१७ अन्वये, ग्रामस्तरावर ग्रामरक्षक दल स्थापन करण्याबाबत ग्रामरक्षक दल नियम, २०१७ प्रसिध्द करण्यात आले आहेत.

२. ग्रामरक्षक दल स्थापन करण्याच्या तसेच ग्रामरक्षक कार्यान्वित करण्याच्या अनुषंगाने ग्रामरक्षक दल नियम, २०१७ च्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीसंदर्भात पुढील प्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

१) ग्रामरक्षक दल स्थापन करण्याबाबत उपविभागीय दंडाधिकारी यांचेकडे शिफारस झाल्यापासून उपविभागीय अधिकारी यांनी ग्रामरक्षक दलाची स्थापना करण्याबाबतचे आदेश ३० दिवसाच्या आत निर्गमित करावे.

२) उपविभागीय दंडाधिकारी यांच्या आदेश प्राप्त झाल्यानंतर तहसिलदारांनी ग्रामरक्षक दलाच्या सदस्यांना १० दिवसाच्या आत ओळखपत्र देण्याबाबत कार्यवाही करावी.

उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करून ग्रामरक्षक दलाचे कामकाज सुरु करण्यात यावे.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१७०६०६१६१४१३१७२९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Punam Hiraman Wagde

Digitally signed by Punam Hiraman Wagde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=26d7295f0f289d96eecb9e12c285 0ebd4f894edc0ea69760a3c1561515a6b8 7, cn=Punam Hiraman Wagde
Date: 2017.06.06 17:04:11 +05'30'

(पु. हि. वागदे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई,
२. मा.मंत्री, राउशु यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.राज्यमंत्री, राउशु यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. अपर मुख्य सचिव (गृह), राज्य उत्पादन शुल्क, मंत्रालय, मुंबई,
५. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
६. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई
८. आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क विभाग, म.रा., मुंबई,
९. सर्व विशेष पोलीस महानिरीक्षक
१०.सर्व जिल्हाधिकारी/जिल्हा दंडाधिकारी
११.सर्व पोलीस आयुक्त/पोलीस अधीक्षक
१२.सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क
१३.सर्व सह सचिव / उप सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
१४.निवड नस्तीं (राउशु-३).

असा. क्र. ५७

रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

मंगळवार, मार्च २५, २००८ / चैत्र ५, शके १९३०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-ब

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### गृह विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २५ मार्च २००८

### आदेश

**मुंबई दारूबंदी कायदा, १९४९.**

क्रमांक एमआयएस-११०८/सीआर-७/इएक्ससी-३.—मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई २५) च्या कलम १३९ च्या पोट-कलम (१) सह पोट-कलम (२) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा आणि त्या बाबतीत त्यास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून याबाबत यापूर्वी निर्गमित करण्यात आलेले आदेश क्र. विसप्र १०९४/१०८८९०/(आश्वा २३५)/इएक्ससी-३, दिनांक ३० जून २००३ अधिक्रमित करून महाराष्ट्र शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे, ते असे :—

१. संक्षिप्त नाव व प्रारंभ.—या आदेशास "मुंबई दारूबंदी (ग्रामसभा ठराव पारित केल्यामुळे अथवा नगरपरिषद/महानगरपालिकेच्या वॉर्डातील मतदारांनी निवेदन दिल्यामुळे अनुज्ञप्ती बंद करणे) आदेश, २००८" असे संबोधण्यात यावे.

२. व्याख्या.—या आदेशात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) "अधिनियम" म्हणजे मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई २५);

(ख) "गटविकास अधिकारी" म्हणजे महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५); मधील कलम २ च्या खंड ५ च्या व्याख्येनुसार अंतर्भूत असलेले गटविकास अधिकारी;

(ग) "मुख्याधिकारी" म्हणजे महाराष्ट्र नगरपरिषदा/नगरपंचायती आणि औद्योगिक वसाहती अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) यामधील कलम २ च्या खंड ५ च्या व्याख्येनुसार अंतर्भूत असलेले मुख्याधिकारी ;

(घ) "जिल्हाधिकारी" म्हणजे मुंबई दारूबंदी कायदा, १९४९ (१९४९ चा मुंबई २५) कलम २ च्या खंड ४ च्या व्याख्येनुसार अंतर्भूत असलेले जिल्हाधिकारी ;

(च) "महानगरपालिका" म्हणजे, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई ५९) मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ चा मुंबई ३), किंवा नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९५० चा सी.पी. आणि बेरर २) यामध्ये अंतर्भूत असलेली महानगरपालिका;

(छ) "उप आयुक्त" म्हणजे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई ५९) नियुक्त केलेले उप आयुक्त ;

(ज) "ग्रामसभा" म्हणजे मुंबई ग्रामपंचायत (ग्रामसभा), नियम १९५९ (१९५९ चा मुंबई ३) यामध्ये अंतर्भूत असलेली ग्रामसभा ;

(झ) "निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क" म्हणजे मुंबई दारूबंदी कायदा, १९४९ (१९४९ चा मुंबई २५) च्या कलम ५ नुसारच्या आदेशाद्वारे अधिकार प्रदान केलेले निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क ;

(य) " अनुज्ञप्ती " म्हणजे मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९ अन्वये देशी दारू किरकोळ विक्रीसाठी देण्यात येणारी नमुना " सीएल-३ ", परमिट रूमसाठी नमुना " एफएल-३ ", बिअरबारसाठी नमुना " ई ", विदेशी दारू किरकोळ विक्रीसाठी नमुना " एफएल-२ " अनुज्ञप्ती ;

(र) "नगरपरिषद" म्हणजे महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक वसाहती अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) यामध्ये अंतर्भूत असलेली नगरपरिषद;

(ल) "ठराव" म्हणजे संबंधित गावातील ग्रामपंचायतीने किंवा ग्रामसभेने किंवा महिला संघटना किंवा सामाजिक संघटना यांनी पारित केलेला ठराव ;

(व) "सचिव" म्हणजे मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (१९५८ चा मुंबई ३) च्या कलम ३ च्या खंड २० च्या व्याख्येनुसार अंतर्भूत असलेले पंचायतीचे सचिव ;

(श) "अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क" म्हणजे मुंबई दारूबंदी कायदा, १९४९ (१९४९ चा मुंबई २५) च्या कलम ५ नुसारच्या आदेशाद्वारे अधिकार प्रदान केलेले अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क.

**३. ग्रामसभेने मद्यविक्रीची दुकाने बंद करण्यासाठी केलेला ठराव.**—(१) ग्रामसभेत किमान ५० टक्के एकूण मतदार किंवा एकूण महिला मतदार उपस्थित राहून साध्या बहुमताने विधिवत ठराव पारित केल्यास, सदर ठरावानुसार जिल्हाधिकारी यांनी अशी मद्यविक्रीची अनुज्ञप्ती बंद करावी असा कोणताही ठराव हा मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ आणि त्याखालील तयार करण्यात आलेल्या नियमातील तरतुदीनुसार विधिवत झालेला असला पाहिजे. मतदारांनी त्याच गावाचे रहिवाशी असल्याबाबतच्या पडताळणीसाठी ग्रामसभेपूर्वी त्यांचे ओळखपत्र सादर करावे. ओळखपत्र नसल्यास, ग्रामपंचायतीच्या सचिवांचे त्या गावाचे मतदार असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे. जे मतदार वरीलप्रमाणे ओळखपत्रे सादर करतील त्यांनाच ग्रामसभेत भाग घेता येईल.

(२) मतदारांची पडताळणी गटविकास अधिकारी त्या विभागाचे निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांचेसह करतील. वरील दोन्ही अधिकारी व संबंधित अनुज्ञप्तीधारकाचे प्रतिनिधी यांचे उपस्थितीत ग्रामसभा संपन्न होईल. ग्रामसभेच्या प्रत्यक्ष कार्यवाहीची चित्रफित तयार करण्यात येईल. सदर चित्रफितीचा पुरावा म्हणून उपयोग करण्यात येईल.

(३) ग्रामसभेने अशा रीतीने ठराव पारित केल्यानंतर ग्रामसभेच्या ठरावाविरुध्द ग्रामसभेने बंद करण्यात आलेली मद्य विक्रीची अनुज्ञप्ती पुन्हा चालू करण्याबाबत ठराव पारित केल्यास अशा प्रकारचा ठराव पारित केल्यापासून एक वर्षापर्यंत जिल्हाधिकारी यांच्याकडून विचारात घेण्यात येऊ नये. ग्रामसभा अनुज्ञप्ती बंद करण्यासंदर्भात ठराव पारित करू शकली नाही तर एक वर्षापर्यंत ग्रामसभेने अनुज्ञप्ती बंद करणेबाबत ठराव पारित करू नये.

४. जर नगरपरिषदा/महानगरपालिका क्षेत्रातील एखाद्या वॉर्डातील २५ टक्केपेक्षा कमी नसलेल्या महिला मतदार किंवा एकूण मतदार यांनी संबंधित अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांचेकडे लेखी निवेदन देऊन संबंधित वॉर्डातील मद्य विक्रीची अनुज्ञप्ती बंद करण्याची मागणी केल्यास ते अशा अर्जाची पडताळणी करतील. निवेदन अर्जावरील सहयांच्या सत्यतेविषयीची पडताळणी योग्य आढळल्यास, जिल्हाधिकारी, यथास्थिती, संबंधित मुख्याधिकारी/उप आयुक्त यांना सोबत जोडलेल्या मतदानपत्रिकेचा वापर करून निर्भयपणे व गुप्त पद्धतीने मतदान घेण्याचे निर्देश देतील. तद्नंतर यथास्थिति, संबंधित मुख्याधिकारी/उप आयुक्त हे मतदानाचे ठिकाण, तारीख व वेळ याबाबतची पूर्वसूचना त्या वॉर्डात किमान ७ दिवस अगोदर जाहिर करतील. सदर मतदानासाठी अद्ययावत (latest) मतदार यादी वापरण्यात येईल. यथास्थिती, मुख्याधिकारी/उप आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेला अनुक्रमे उप मुख्याधिकारी/सहायक आयुक्त यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसलेला अधिकारी यांच्या पर्यवेक्षणाखाली त्या वॉर्डातील महिला मतदारांचे किंवा एकूण मतदारांचे गुप्त पद्धतीने मतदान घेण्याची प्रक्रीया पूर्ण करण्यात यावी. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांचे निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्कच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचे नसलेले प्रतिनिधी तसेच मद्य अनुज्ञप्तीधारक अथवा प्रतिनिधी संबंधित मतदानाचे वेळी उपस्थित राहतील. जर संबंधित वॉर्डातील एकूण मतदार किंवा महिला मतदारांच्या संख्येच्या किमान ५० टक्क्यांपेक्षा अधिक अनुक्रमे एकूण मतदार किंवा महिला मतदार यांनी मद्य विक्रीची अनुज्ञप्ती बंद करण्याच्या बाजुने मतदान केल्यास त्या वॉर्डातील संबंधित मद्य विक्रीची अनुज्ञप्ती बंद करण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी द्यावेत.

५. **प्राप्त झालेला ठराव किंवा निवेदनावरील कार्यवाही पूर्ण करण्यासाठीचा कालावधी.**— संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे मद्य विक्रीची अनुज्ञप्ती बंद करण्याबाबत ठराव अथवा निवेदन प्राप्त झाल्यानंतर आवश्यक ती अंतिम कार्यवाही ठराव किंवा निवेदन प्राप्त झाल्यापासून तीन महिन्यांच्या आत पूर्ण करतील. जर कोणत्याही कारणास्तव तीन महिन्यात अंतिम कार्यवाही पूर्ण करणे शक्य नसल्यास, जिल्हाधिकारी यांनी संपूर्ण समर्थनासह आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क) यांना मुदतवाढीकरिता पूर्वमान्यता घेण्यासाठी प्रस्ताव सादर करावा.

६. **खंड ४ अंतर्गत मतदानाच्या जागेची निवड.**— यथास्थिती, मुख्याधिकारी/उप आयुक्त हे मतदानाच्या जागेची निवड करून जागा निश्चित करतील. परंतु, अशा जागेची निवड करताना नगरपरिषदा/महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या मतदानासाठी ज्या तत्त्वावर मतदानाची जागा निवडली जाते, त्या तत्त्वावर जागेची निवड करावी.

७. **मतदानाची जागा, तारीख व वेळ जाहीर करणे.**— (१) त्याचप्रमाणे जर संबंधित नगरपरिषद/महानगरपालिका वॉर्डातील मद्यविक्रीची अनुज्ञप्ती बंद करण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी गुप्त मतदान घेण्याचा निर्णय घेतला तर संबंधित नगरपरिषद/महानगरपालिका वॉर्डातील मतदानाचे ठिकाण, तारीख व वेळ याबाबतची सूचना किमान ७ दिवस अगोदर संबंधित वॉर्ड कार्यालय आणि नगरपरिषद/महानगरपालिकेचे मुख्य कार्यालय येथील सूचना फलकावर लावण्यात यावी.

(२) गुप्त मतदानाची वेळ सकाळी ०८.०० ते दुपारी ०२.०० वाजेपर्यंत ठेवण्यात यावी.

८. **मतमोजणीचे ठिकाण, तारीख आणि वेळ जाहीर करणे.**— (१) यथास्थिती, मुख्याधिकारी/उप आयुक्त यांनी मतमोजणीचे ठिकाण, तारीख व वेळ याबाबतची पूर्वसूचना मतदानाच्या तारखेच्या किमान ७ दिवस अगोदर संबंधित वॉर्ड कार्यालय आणि नगरपरिषद/महानगरपालिकेचे मुख्य कार्यालय येथील सूचना फलकावर लावण्यात यावी.

(२) मतमोजणी ही मतदानाच्या दिवशी दुपारी ४.०० वाजता सुरू करण्यात यावी.

(३) नगरपरिषद/महानगरपालिका वॉर्डातील मतमोजणीची प्रक्रीया ही मुख्याधिकारी/उप आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अनुक्रमे उप मुख्याधिकारी/सहायक आयुक्त यांच्यापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याच्या पर्यवेक्षणाखाली पूर्ण करण्यात यावी.

(४) मुख्याधिकारी/उप आयुक्त यांनी मतमोजणीचा निकाल मतमोजणीनंतर तत्काळ जाहीर करावा व जिल्हाधिकारी यांना तसा अहवाल त्वरित सादर करावा.

९. **गुप्त मतदानासाठी मतपत्रिकेचा नमुना,—**

| |
|---|
| (१) गावाचे नाव/(महानगरपालिका/नगरपरिषद असल्यास, वॉर्डाचे नाव) |
| (२) सीएल-३/एफएल-२/एफएल-३/नमुना "ई" अनुज्ञप्तीधारकाचे नाव/अनुज्ञप्तीवरील फर्मचे नाव |
| (३) मतदानाची तारीख व वेळ |
| **मद्यविक्री अनुज्ञप्ती चालू ठेवावी** |
| **मद्यविक्री अनुज्ञप्ती बंद करावी.** |

मतदान अधिकाऱ्याची सही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

गौ. जो. रसाळ,
शासनाचे उप सचिव.

## आदेश

गृह विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.
दिनांक :- ६ जून, २०१७.

महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम

क्रमांक:एमआयएस-०११७/प्र.क्र.१८/राउशु-३.—महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई २५) च्या कलम १३९ च्या पोट-कलम (१) सह पोट-कलम (२) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा आणि त्या बाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे "मुंबई दारुबंदी (ग्रामसभा ठराव पारित केल्यामुळे अथवा नगर परिषद / महानगरपालिकेच्या वार्डातील मतदारांनी निवेदन दिल्यामुळे अनुज्ञप्ती बंद करणे) आदेश, २००८" मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे, ते असे :-

१. या आदेशास "मुंबई दारुबंदी (ग्रामसभा ठराव पारित केल्यामुळे अथवा नगर परिषद / महानगरपालिकेच्या वार्डातील मतदारांनी निवेदन दिल्यामुळे अनुज्ञप्ती बंद करणे) (१ ली सुधारणा) आदेश, २०१७" संबोधण्यात यावे.

२. "मुंबई दारुबंदी (ग्रामसभा ठराव पारित केल्यामुळे अथवा नगर परिषद / महानगरपालिकेच्या वार्डातील मतदारांनी निवेदन दिल्यामुळे अनुज्ञप्ती बंद करणे) आदेश, २००८" (यात "प्रमुख आदेश" म्हणून संदर्भित) मधील कलम २ मध्ये, पोट-कलम (ज) नंतर पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात यावा :-

"(ज१) "नगर पंचायत" म्हणजे "महाराष्ट्र नगरपरिषद, नगर पंचायत व औद्योगिक वसाहत अधिनियम, १९६५" (१९६५ चा महा.४० ) अंतर्गत स्थापन केलेली नगरपंचायत.

३. मूळ आदेशातील कलम ४ मध्ये "नगरपरिषद किंवा महानगरपालिका" या शब्दाऐवजी "नगरपरिषद,नगरपंचायत किंवा महानगरपालिका" असे समाविष्ट करावे.

४. मुख्य आदेशातील कलम ५ मध्ये "नगरपरिषद किंवा महानगरपालिका" या शब्दाऐवजी "नगरपरिषद, नगरपंचायत किंवा महानगरपालिका" असे समाविष्ट करावे.

५. मुख्य आदेशातील कलम ६ मध्ये "नगरपरिषद किंवा महानगरपालिका" या शब्दाऐवजी "नगरपरिषद, नगरपंचायत किंवा महानगरपालिका" असे समाविष्ट करावे.

६. मुख्य आदेशातील कलम ७ ऐवजी खालील कलम समाविष्ट करण्यात येत आहे.

**७. मतमोजणीचे ठिकाण, तारीख आणि वेळ जाहीर करणे.-** (१) जर जिल्हाधिकाऱ्याने ग्रामपंचायतीतील किंवा नगरपंचायतीच्या वॉर्डातील किंवा महानगरपालिका/नगर परिषदेच्या वार्डातील मद्यविक्री अनुज्ञप्ती बंद करण्याबाबत गुप्त मतदान घेण्याचे ठरविले तर, संबंधित वार्ड ऑफीसच्या आणि संबंधित ग्रामपंचायतीच्या मुख्यालय किंवा नगर पंचायत किंवा नगर परिषद किंवा महानगरपालिकेच्या नोटीस बोर्डवर मतदानाच्या दिनांकाअगोदर कमीत कमी ७ दिवस आधी प्रसिध्द करण्यात यावी.

(२) मतदानाची वेळ सकाळी ८.०० ते सायं. ५.०० असेल.

७. मुख्य आदेशातील कलम ७ मध्ये, (i) उप कलम (१) "नगर परिषद किंवा महानगरपालिका" या शब्दाऐवजी "नगर परिषद, नगर पंचायत किंवा महानगर पालिका" असे शब्द समाविष्ट करण्यात यावे."

(ii) उपकलम (२) मध्ये, "सायंकाळी ४.०० वाजेपासून सुरु" या शब्द, अंक व वर्णाऐवजी "सायंकाळी ६.०० वाजेपासून सुरु" हे शब्द, अंक व वर्ण समाविष्ट करण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( पु. हि. वागदे )
शासनाचे सह सचिव.

असा. क्र. २५ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

गुरुवार, फेब्रुवारी १२, २००९/माघ २३, शके १९३०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-ब

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### गृह विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ फेब्रुवारी २००९

### अधिसूचना

**मुंबई दारूबंदी कायदा, १९४९.**

क्रमांक एमआयएस. ११०८/सीआर-७/इएक्सी-३.— मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई २५) च्या कलम १३९ च्या पोट-कलम (१) सह पोट-कलम (२) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा आणि त्या बाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून मुंबई दारूबंदी (ग्रामसभा ठराव पारित केल्यामुळे अथवा नगरपरिषद/महानगरपालिकेच्या वॉर्डातील मतदारांनी निवेदन दिल्यामुळे अनुज्ञप्ती बंद करणे) यामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे, ते असे :—

" मुंबई दारूबंदी (ग्रामसभा ठराव पारित केल्यामुळे अथवा नगरपरिषद/महानगरपालिकेच्या वॉर्डातील मतदारांनी निवेदन दिल्यामुळे अनुज्ञप्ती बंद करणे) आदेश, २००८" मध्ये,—

(अ) कलम ३ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात यावा :—

" जर ग्रामीण भागात २५% पेक्षा कमी नसलेल्या महिला मतदार किंवा एकूण मतदार यांनी संबंधित अधीक्षक , राज्य उत्पादन शुल्क यांचेकडे लेखी निवेदन देऊन गावातील मद्यविक्रीची

अनुज्ञप्ती बंद करण्याची मागणी केल्यास अशा अर्जांची पडताळणी, अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांनी करावी. सदर निवेदनातील सह्यांची अधिप्रमाणता व खरेपणाविषयी पडताळणी केल्यानंतर जिल्हाधिकारी यांनी संबंधित तहसीलदार यांना सोबत जोडलेल्या नमुन्यातील मतदान पत्रिकेचा वापर करून निर्भयपणे व गुप्त पद्धतीने मतदान घेण्याचे निर्देश देतील. तद्नंतर संबंधित तहसीलदार हे मतदानाचे ठिकाण, तारीख व वेळ याबाबतची पूर्वसूचना किमान सात दिवस अगोदर जाहीर करतील. सदर मतदानासाठी अद्ययावत मतदार यादी वापरण्यात येईल. संबंधित गावातील मतदाराची मतदानाची प्रक्रिया गुप्त मतदान पद्धतीने तहसीलदार यांच्या पर्यवेक्षणाखाली अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या व नायब तहसीलदारापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याच्या पर्यवेक्षणाखाली पूर्ण करण्यात यावी. मतदानाचे वेळी निरीक्षक दर्जापेक्षा कमी नसलेला अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांचा प्रतिनिधी आणि मद्य अनुज्ञप्तीधारक अथवा प्रतिनिधी यांना उपस्थित राहण्याची परवानगी द्यावी. जर अशा मतदानात स्त्री मतदारांच्या किंवा एकूण मतदारांच्या ५०% मतदारांनी मद्य अनुज्ञप्ती बंद करण्याच्या बाजूने मत दिल्यास जिल्हाधिकारी यांनी सदर मद्य अनुज्ञप्ती बंद करण्याचे आदेश द्यावेत.''

(ब) कलम ५ मध्ये,—

(i) शीर्षकामधील '' अथवा कलम (४) खाली प्राप्त झालेले निवेदन '' या शब्द, कंस आणि आकड्याऐवजी '' अथवा कलम ३ (अ) आणि (४) खाली प्राप्त झालेले निवेदन,'' असे समाविष्ट करावे.

(ii) '' कलम ४ खाली नगरपरिषद अथवा महानगरपालिका वॉर्डातून प्राप्त झालेली निवेदन, '' या शब्द, कंस व आकड्यांऐवजी, '' कलम ३ (अ) आणि ४ खाली '' गाव, अथवा नगरपरिषद अथवा महानगरपालिका वॉर्डतून प्राप्त झालेले निवेदन असे समाविष्ट करावे.

(क) कलम ९ मध्ये '' महानगरपालिका/नगरपरिषदबाबत वॉर्डाचे नाव '' या शब्दांऐवजी '' गावाचे नाव अथवा महानगरपालिका/नगरपरिषदेबाबत वॉर्डाचे नाव. '' असे समाविष्ट करण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्र. ता. गौड,**
शासनाचे सहसचिव.

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष २, अंक १०२] मंगळवार, ऑगस्ट १६, २०१६/श्रावण २५, शके १९३८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक २११

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

गृह विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ ऑगस्ट २०१६

आदेश


महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.

क्रमांक एमआयएस. ११०८/सीआर-७/इएक्ससी-३.—महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा २५) च्या कलम १३९ च्या पोट-कलम (१) आणि (२) यांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा आणि त्या बाबतीत त्यास सक्षम करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे मुंबई दारुबंदी (ग्रामसभा ठराव पारीत केल्यामुळे अथवा नगरपरिषद/महानगरपालिकेच्या वॉर्डातील मतदारांनी निवेदन दिल्यामुळे अनुज्ञप्ती बंद करणे) आदेश, २००८ यामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे ते असे—

१. या आदेशास मुंबई दारुबंदी (ग्रामसभा ठराव पारीत केल्यामुळे अथवा नगरपरिषद/महानगरपालिकेच्या वॉर्डातील मतदारांनी निवेदन दिल्यामुळे अनुज्ञप्ती बंद करणे) (सुधारणा) आदेश, २०१६ असे संबोधण्यात यावे.

२. मुंबई दारुबंदी (ग्रामसभा ठराव पारीत केल्यामुळे अथवा नगरपरिषद/महानगरपालिकेच्या वॉर्डातील मतदारांनी निवेदन दिल्यामुळे अनुज्ञप्ती बंद करणे) आदेश, २००८ मधील खंड ९ ऐवजी पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" गुप्त मतदानासाठी मतपत्रिकेचा नमुना–

| | |
|---|---|
| (१) गावाचे नाव (महानगरपालिका/नगरपरिषद असल्यास, वार्डाचे नाव) | |
| (२) सीएल-३/एफएल-२/एफएल-३/एफएलबीआर-२/नमुना 'ई' अनुज्ञप्ती धारकाचे नाव/अनुज्ञप्तीवरील फर्मचे नाव | |
| (३) मतदानाची तारीख व वेळ | |
| मद्य विक्री अनुज्ञप्ती चालू ठेवावी |  |
| मद्य विक्री अनुज्ञप्ती बंद करावी. |  |

मतदान अधिकाऱ्याची सही. "

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

पु. हि. वागदे,
शासनाचे सहसचिव.

RNI No. MAHBIL/2009/37831
Reg. No. MH/MR/South-339/2014-16

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ६, अंक ८५] शुक्रवार, ऑक्टोबर ३१, २०१४/कार्तिक ९, शके १९३६ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक २५१

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश

### गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ ऑक्टोबर २०१४

### अधिसूचना

महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम

क्रमांक एमआयएस-९१२/प्र.क्र. ३३६/राऊशु-३.—महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा २५) याच्या कलम १४३ च्या पोट-कलम (२) च्या खंड (ह १) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून आणि याबाबतीत यापूर्वी केलेल्या सर्व नियमांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्र शासनाने करण्याचे योजिलेल्या नियमांचा पुढील मसुदा हा, त्यामुळे बाधा पोचण्याची शक्यता असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीकरिता, उक्त अधिनियमाच्या कलम १४३ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, उक्त मसुदा, महाराष्ट्र शासनाकडून दिनांक १२ नोव्हेंबर २०१४ रोजी किंवा त्यानंतर विचारात घेण्यात येईल.

उपरोक्त दिनांकापूर्वी, उक्त मसुद्याच्या संबंधात, कोणत्याही व्यक्तीकडून ज्या कोणत्याही हरकती किंवा सूचना, आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, ओल्ड कस्टम हाऊस, २ रा मजला, शहीद भगतसिंग मार्ग, मुंबई ४०० ०२३ यांच्याकडे प्राप्त होतील त्या शासन विचारात घेईल.

१. संक्षिप्त नाव व्याप्ती.—(१) या नियमांना, महाराष्ट्र पंचायतीसंबंधीचे उपबंध अनुसूचीत क्षेत्रांवर विस्तारित करण्याबाबत (दारुबंदी व अनुज्ञप्तीचे विनियमन) नियम, २०१४ असे म्हणावे.

(२) ते, महाराष्ट्र राज्यातील सर्व अनुसूचीत क्षेत्रांना लागू असतील.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,–

(क) " अधिनियम " याचा अर्थ, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम असा आहे.

(ख) " ग्रामसभा " याचा अर्थ, पंचायतीच्या क्षेत्रात समाविष्ट असलेल्या गावाच्या संबंधातील मतदार याद्यांमध्ये नावनोंदणी केलेल्या व्यक्तींची मिळून बनलेली सभा असा आहे ;

(ग) " पंचायत " याचा अर्थ, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३) अन्वये स्थापन केलेली किंवा स्थापन केली असल्याचे मानली गेलेली पंचायत, असा आहे ;

(घ) " अनुसूचीत क्षेत्रे " याचा अर्थ, भारताचे संविधान याच्या अनुच्छेद २४४ च्या खंड (१) मध्ये निदेश केलेली अनुसूचीत क्षेत्रे, असा आहे ;

(ङ) या नियमांमध्ये वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना (अधिनियमामध्ये) अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच अर्थ असतील.

३. अनुसूचित क्षेत्रांमधील गावामध्ये मादक द्रव्यांची निर्मिती किंवा व्यापार करण्याची अनुज्ञप्ती देण्यापूर्वी, अनुज्ञप्ती मंजुरी प्राधिकरणाने ग्रामसभेचे मत घेणे.—(१) अनुज्ञप्ती मंजुरी प्राधिकरण हे, राज्य शासनाच्या प्रचलित धोरणानुसार, कोणत्याही मादक द्रव्याची निर्मिती करणाऱ्या घटकाची स्थापना करण्यासंबंधात अनुज्ञप्ती देण्याबाबत आलेल्या अर्जाविषयी अनुसूचीत क्षेत्रातील संबधित ग्रामपंचायतीला माहिती कळवील. अशी सूचना मिळाल्यावर, पंचायत, ग्रामसभा बोलावील आणि ती सूचना मिळाल्याच्या दिनांकापासून चार आठवड्यांच्या कालावधीत उक्त अर्जावर ठरावाच्या स्वरूपात आपले मत कळवील.

(२) अनुज्ञप्ती मंजुरी प्राधिकरण हे, राज्य शासनाच्या प्रचलित धोरणानुसार, कोणत्याही मादक द्रव्याचा व्यापार करण्यासंबंधातील अनुज्ञप्ती देण्याबाबत आलेल्या अर्जाविषयी अनुसूचीत क्षेत्रातील संबंधीत ग्रामपंचायतीला माहिती कळवील. अशी सूचना मिळाल्यावर, पंचायत, ग्रामसभा बोलावील आणि ती सूचना मिळाल्याच्या दिनांकापासून चार आठवड्यांच्या कालावधीत उक्त अर्जावर ठरावाच्या स्वरूपात आपले मत कळवील.

(३) अनुज्ञप्ती मंजुरी प्राधिकरण हे, संबंधित ग्रामसभेच्या सूचनेस अनुसरून, अधिनियमाच्या व त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींनुसार घेतलेल्या निर्णयाच्या संबंधात लेखी आदेश काढील. ग्रामसभेचा ठराव बंधनकारक व अंतिम असेल.

४. अशाप्रकारे दिलेल्या अनुज्ञप्तींची मुदत संपण्यापूर्वी, तिचे नुतनीकरण करण्यासाठी ग्रामसभेच्या ठरावाची आवश्यकता असेल. जर अनुज्ञप्तीधारकाने अशाप्रकारे अर्ज केला असेल तर, अनुज्ञप्तीची मुदत संपण्याच्या दिनांकाच्या तीस दिवस अगोदर अनुज्ञप्ती मंजुरी प्राधिकरणाने अनुज्ञप्तीच्या नुतनीकरणाचा प्रस्ताव ग्रामसभेला सादर करणे आवश्यक असेल. ग्रामसभा, अनुज्ञप्तीची मुदत संपण्याच्या दिनांकापूर्वी, उक्त अर्जावर ठरावाच्या स्वरूपात आपले मत कळवील.

५. ग्रामसभा, शासकीय आदेश, गृह विभाग क्र.बीपीए. ०८७६/८३६/(दोन)-पीआरओ-३, दिनांक २८ एप्रिल १९८१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, अनुसूचीत क्षेत्रांमधील गावामध्ये राहणाऱ्या अनुसूचीत जमातींना विक्रीसाठी नव्हे तर त्यांच्या सेवनासाठी जे शुद्ध करता येईल किंवा गाळता येईल अशा स्थानिक परंपरागत मादक द्रव्याचे प्रमाण निर्धारित करील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अं. शा. घार्गे,
शासनाचे सह सचिव.

RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष १, अंक १७] गुरूवार, मार्च ५, २०१५/फाल्गुन १४, शके १९३६ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १.००

### असाधारण क्रमांक ४४

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ मार्च २०१५

### अधिसूचना

महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९.

क्रमांक एमआयएस. ९१२/प्र. क्र. ३३६/राऊशु-३.—महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम (१९४९ चा २५) याच्या कलम १४३ च्या पोट-कलम (२) च्या खंड (ह १) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि या बाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे खालील नियम करीत आहे, की जे यापूर्वी उक्त कलम १४३ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे प्रसिद्ध करण्यात आले आहेत, जसे :—

१. संक्षिप्त नाव व व्याप्ती.—(१) या नियमांना, महाराष्ट्र पंचायतीसंबंधीचे उपबंध अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करण्याबाबत (दारुबंदी व लायसनचे विनियमन) नियम, २०१५ असे म्हणावे ;

(२) ते, महाराष्ट्र राज्यातील सर्व अनुसूचित क्षेत्रांना लागू असतील.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " अधिनियम " याचा अर्थ, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, असा आहे ;

(ख) " ग्रामसभा " याचा अर्थ, पंचायतीच्या क्षेत्रात समाविष्ट असलेल्या गावाचा संबंधातील मतदार याद्यांमध्ये नावनोंदणी केलेल्या व्यक्तींची मिळून बनलेली सभा असा आहे ;

(ग) " पंचायत " याचा अर्थ, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३) अन्वये स्थापन केलेली किंवा स्थापन केली असल्याचे मानली गेलेली पंचायत, असा आहे ;

(घ) " अनुसूचित क्षेत्रे " याचा अर्थ, भारताचे संविधान याच्या अनुच्छेद २४४ च्या खंड (१) मध्ये निर्देश केलेली अनुसूचित क्षेत्रे, असा आहे. ;

(ङ) या नियमांमध्ये वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना (अधिनियमामध्ये) अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच अर्थ असतील ;

३. अनुसूचित क्षेत्रांमधील गावामध्ये मादक द्रव्यांची निर्मिती किंवा व्यापार करण्याचे अनुज्ञप्ती देण्यापूर्वी, अनुज्ञप्ती मंजुरी प्राधिकरणाने ग्रामसभेचे मत घेणे.—(१) अनुज्ञप्ती मंजुरी प्राधिकरण हे, राज्य शासनाच्या प्रचलित धोरणानुसार, कोणत्याही मादक द्रव्याची निर्मिती करणाऱ्या घटकाची स्थापना करण्यासंबंधात अनुज्ञप्ती देण्याबाबत आलेल्या अर्जाविषयी अनुसूचित क्षेत्रातील संबंधित ग्रामपंचायतीला माहिती कळवील. अशी सूचना मिळाल्यावर, पंचायत, ग्रामसभा बोलावील आणि ती सूचना मिळाल्याच्या दिनांकापासून चार आठवड्यांच्या कालावधीत उक्त अर्जावर ठरावाच्या स्वरूपात आपले मत कळवील.

(२) अनुज्ञप्ती मंजुरी प्राधिकरण हे, राज्य शासनाच्या प्रचलित धोरणानुसार, कोणत्याही मादक द्रव्याचा व्यापार करण्यासंबंधातील अनुज्ञप्ती देण्याबाबत आलेल्या अर्जाविषयी अनुसूचित क्षेत्रातील संबंधित ग्रामपंचायतीला माहिती कळवील. अशी सूचना मिळाल्यावर, पंचायत, ग्रामसभा बोलावील आणि ती सूचना मिळाल्याच्या दिनांकापासून चार आठवड्यांच्या कालावधीत उक्त अर्जावर ठरावाच्या स्वरूपात आपले मत कळवील.

(३) अनुज्ञप्ती मंजुरी प्राधिकरण हे, संबंधित ग्रामसभेच्या सूचनेस अनुसरून, अधिनियमाच्या व त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींनुसार घेतलेल्या निर्णयाच्या संबंधात लेखी आदेश काढील. ग्रामसभेचा ठराव बंधनकारक व अंतिम असेल.

४. अशा प्रकारे दिलेल्या अनुज्ञप्तीची मुदत संपण्यापूर्वी, तिचे नुतनीकरण करण्यासाठी ग्रामसभेच्या ठरावाची आवश्यकता असेल. जर अनुज्ञप्तीधारकाने अशाप्रकारे अर्ज केला असेल तर, अनुज्ञप्तीची मुदत संपण्याच्या दिनांकाच्या तीस दिवस अगोदर अनुज्ञप्ती मंजुरी प्राधिकरणाने अनुज्ञप्तीच्या नुतनीकरणाचा प्रस्ताव ग्रामसभेला सादर करणे आवश्यक असेल. ग्रामसभा, अनुज्ञप्तीची मुदत संपण्याच्या दिनांकापूर्वी, उक्त अर्जावर ठरावाच्या स्वरुपात आपले मत कळवील.

५. ग्रामसभा, शासन आदेश, गृह विभाग क्र. बीपीए. ०८७६/८३६/(दोन)-पीआरओ-३, दिनांक २८ एप्रिल १९८१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, अनुसूचित क्षेत्रांमधील गावामध्ये राहणाऱ्या अनुसूचित जमातींना विक्रीसाठी नव्हे तर त्यांच्या सेवनासाठी जे शुद्ध करता येईल किंवा गाळता येईल अशा स्थानिक परंपरागत मादक द्रव्याचे प्रमाण निर्धारित करील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अं. शा. घार्गे,
शासनाचे सहसचिव.

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष २, अंक १५८] शुक्रवार, डिसेंबर २, २०१६/अग्रहायण ११, शके १९३८ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

### असाधारण क्रमांक ३०६

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

गृह विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ नोव्हेंबर २०१६

अधिसूचना

महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम.

क्रमांक एफएलआर-१७११/प्र.क्र.१६७/राउशु-२.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनास असे वाटते की, मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ मध्ये सुधारणा करून खालील नियम तात्काळ अंमलात आणावेत आणि म्हणून महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम (१९४९ चा मुंबई २५) च्या कलम १४३ च्या उप-कलम (३) च्या परंतुकानुसार तरतूद केल्याप्रमाणे हे नियम आधी प्रसिद्ध न करता करण्यात यावेत.

त्याअर्थी, आता महाराष्ट्र दारूबंदी नियम (१९४९ चा मुंबई २५) च्या कलम १४३ च्या पोट-कलम (२) च्या खंड (वी) व (एफ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या आणि त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ मध्ये खालील सुधारणा करीत आहे ते असे :—

(१) या नियमांना मुंबई विदेशी मद्य (दुसरी सुधारणा) नियम, २०१६ असे म्हणावे.

(२) उक्त मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ च्या नियम ७०-ड मधील उप-नियम (६) मध्ये,—

(एक) " किंवा देशी मद्य किंवा त्यापैकी दोन्ही " हा मजकूर वगळण्यात येईल ;

(दोन) " प्रति महिना " या मजकुरानंतर " आणि अशा परवानाधारकाला देशी मद्याच्या दोन युनिट पर्यंत प्रति महिना खरेदी करता येईल किंवा ते प्राप्त करता येईल आणि ते कोणत्याही वेळी दोन युनिट पेक्षा अधिक देशी मद्य ताब्यात ठेवणार नाही किंवा त्याचा साठा करून ठेवणार नाही " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

पु. हि. वागदे,
शासनाचे सहसचिव.

# महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ मधील शिक्षेच्या तरतुदी

| अ.क्र. | कलम | गुन्हयाचा प्रकार | शिक्षा |
|---|---|---|---|
| १ | ६५(a) | कोणतेही मादक द्रव्य किंवा भांग आयात / निर्यात करील | किमान ३ वर्षे व ५ वर्षापर्यंत वाढविता येईल इतका कारावास किंवा किमान रुपये २५ हजार परंतु ५० हजार पर्यंत वाढविता येईल इतका द्रव्यदंड किंवा दोन्ही शिक्षा होतील |
| | (b) | कोणतेही मादक द्रव्य तयार करील | |
| | (c) | कोणतीही दारुची भट्टी / कारखाना बांधिल किंवा चालविल. | |
| | (d) | दारु बाटलीत भरील | |
| | (e) | कोणतेही मादक द्रव्य किंवा भांग विकेल अथवा विकत घेईल | |
| २ | ६६(१)(b) | कोणतेही मादक द्रव्य सेवन करील किंवा वापरील | किमान ३ महिने ते ६ महिन्यापर्यंत वाढविता येईल इतका कारावास किंवा रुपये ५ हजार परंतु १० हजार पर्यंत वाढविता येईल इतका द्रव्यदंड किंवा दोन्ही शिक्षा होतील |
| ३ | ६८(a) | कोणतीही जागा दारुचा सार्वजनिक गुत्ता म्हणून उघडील | किमान ३ वर्षे ते ५ वर्षापर्यंत वाढविता येईल इतका कारावास किंवा रुपये २५ हजार परंतु ५० हजार पर्यंत वाढविता येईल इतका द्रव्यदंड किंवा दोन्ही शिक्षा होतील |
| | (b) | दारुचा सार्वजनिक गुत्त्यावर देखरेख / नियंत्रण / व्यवस्था पाहील. | |
| ४ | ८१ | या कायद्याखालील अपराध करण्याचा प्रयत्न करील किंवा ती करण्यास अपप्रेरणा देईल | मुख्य अपराधाबद्दल जी शिक्षा सांगितली असेल तितकी |
| ५ | ८३ | दोन किंवा अधिक व्यक्ती अपराध स्वत: करण्याचे किंवा तो दुसऱ्या व्यक्ती कडून करवण्याचे ठरवितील | किमान ३ वर्षे ते ५ वर्षापर्यंत वाढविता येईल इतका कारावास किंवा रुपये २५ हजार परंतु ५० हजार पर्यंत वाढविता येईल इतका द्रव्यदंड किंवा दोन्ही शिक्षा होतील |
| ६ | ८४ | जी व्यक्ती दारुच्या गुत्यात दारु पिऊन धुंद झाल्याचे किंवा पीत असल्याचे किंवा पिण्यासाठी हजर असल्याचे आढळून आल्यास | रुपये ५ हजार पर्यंत द्रव्य दंड |
| ७ | ८५ | सार्वजनिक ठिकाणी दारुच्या नशेत गैरशिस्तीने वागेल अशा व्यक्तीस | ६ महिन्यापर्यंत कैद व रुपये १० हजार पर्यंत द्रव्य दंड |
| ८ | ९३ | सराईत गुन्हेगाराकडून चांगल्या वर्तणुकीचे बंधपत्र | |

टीप:-वरील सर्व शिक्षा व दंडाच्या रक्कमेत वाढ करण्याचा शासनाचा मानस आहे.

# भारतीय दंड संहिता १८६० मधील शिक्षेच्या तरतुदी

| कलम | गुन्ह्याचा प्रकार | शिक्षेची तरतुद |
|---|---|---|
| ३२३ | इच्छापूर्वक साधी दुखापत करणे | १ वर्षापर्यंत कारावास किंवा रु.१००० दंड किंवा दोन्ही शिक्षा |
| ३२४ | घातक शस्त्राने अगर साधनाने इच्छापूर्वक साधी दुखापत करणे | ३ वर्षापर्यंत कारावास किंवा दंड किंवा दोन्ही शिक्षा |
| ३२५ | इच्छापूर्वक गंभीर दुखापत करणे | ७ वर्षापर्यंत कारावास व दंड |
| ३२६ | घातक शस्त्राने अगर साधनाने इच्छापूर्वक गंभीर दुखापत करणे | १० वर्षापर्यंत कारावास व दंड |
| ५०४ | सार्वजनिक शांतताभंग करण्याच्या उद्देशाने अपमान करणे / शिवीगाळ करणे | २ वर्षापर्यंत कारावास किंवा दंड किंवा दोन्ही |
| ५०६ | फौजदारीपात्र धाकदपटशा | २ वर्षापर्यंत कारावास किंवा दंड किंवा दोन्ही .परंतु जीवे ठार मारण्याची धमकी दिल्यास ७ वर्षापर्यंत कारावास किंवा दंड किंवा दोन्ही. |
| १६० | सार्वजनिक ठिकाणी मारामारी | १ महिन्यापर्यंत कारावास किंवा दंड किंवा दोन्ही |
| ३५४ | विनयभंग करण्याच्या उद्देशाने स्त्रीवर हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग करणे | १ वर्ष कारावास ती ५ वर्षापर्यंत वाढवता येईल तसेच दंडही करता येईल. |
| ३५४ अ | लैंगीक सतावणुक | १ वर्षापर्यंत कारावास किंवा दंड किंवा दोन्ही. |
| ३५४ ब | स्त्रीला विवस्त्र करण्याच्या उद्देशाने तिच्या हल्ला करणे किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग करणे | ३ ते ७ वर्ष कारावास आणि दंड |
| ३५४ क | स्त्रीचे चोरुन अश्लील चित्रण करणे | ३ ते ७ वर्ष कारावास आणि दंड |
| ३५४ ड | स्त्रीचा चोरुन पाठलाग करणे | ३ ते ५ वर्ष कारावासआणि दंड |
| ३७६ | बलात्कार | ७ वर्ष कारावास परंतु ती जन्म ठेपेपर्यंत वाढवता येईल तसेच दंड |
| ३७६ अ | पिडीत स्त्रीच्या मृत्यूस कारणीभूत होणे किंवा ती कायमस्वरुपी वनस्पतीरुप अवस्था होण्यास कारणीभूत होणे. | २० वर्ष कारावास परंतु ती जन्म ठेपेपर्यंत वाढवता येईल. |
| ३७६ ड | सामुहिक बलात्कार | २० वर्ष कारावास परंतु ती जन्मठेपपर्यंत वाढवता येईल. |
| ३७६ ई | बलात्कार या अपराधाची पुनरावृत्ती करणे | जन्मठेप |
| ३७७ | अनैसर्गिक संभोग | १० वर्षापर्यंत कारावास आणि दंड |
| ४९८ अ | एखाद्या स्त्रीच्या पतीने अगर त्याच्या नातेवाईकाने विवाहितेस क्रूर वागणूक देणे | ३ वर्षापर्यंत कारवास आणि दंड |

## ग्रामरक्षक दलाच्या तक्रारीवर करण्यात येणाऱ्या अंमलबजावणी व कायद्यातील तरतुदी बाबत

| अ.क्र. | महत्वाचा मुद्दा | कायदा, नियम व परिपत्रकातील तरतुदी |
|---|---|---|
| १ | ग्रामरक्षक दलाने गावामध्ये चाललेली अवैध दारुभट्टी संबंधाने उत्पादन शुल्क विभाग आणि पोलीस निरीक्षकांना कळविल्यानंतर बारा (१२) तासांच्या आतमध्ये त्यांच्यावर गुन्हा दाखल करणे, दारुभट्टीचा मालक व इतर कोणी भट्टी चालवीत असतील अशा सर्वांवर गुन्हे दाखल करणेबाबत | ग्रामरक्षक दलाने केलेल्या तक्रारीवर १२ तासांच्या आत कारवाई करून गुन्हे दाखल करण्याबाबत शासन परिपत्रक दि. १८ एप्रिल, २०१७ मध्ये नमूद केलेले आहे. त्याचप्रमाणे अवैध मद्य विक्रीच्या व्यसायात गुंतलेल्या इसमा समवेत जागा मालकाचा सक्रिय सहभाग असल्यास त्याचेवर सुध्दा कारवाई करण्याच्या सूचना शासन परिपत्रक दिनांक १ मार्च, २०१७ अन्वये देण्यात आलेल्या आहेत.<br>महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ मधील कलम ६५ व ८६ मध्ये अशा अवैध व्यवसाय करणाऱ्यास द्यावयाच्या शिक्षेची तरतुद नमूद केलेली आहे. |
| २ | दारु पिऊन भांडणे, माऱ्यामाऱ्या करतात, दहशत निर्माण करतात अशा लोकांची माहिती ग्रामरक्षक दलाने पाठविल्यांनतर पोलीस निरीक्षकांनी ताबडतोब येऊन अशा लोकांना ताब्यात घेऊन त्यांची वैद्यकीय तपासणी करुन दारूची नशा करून गुन्हा केला आहे हे स्पष्ट झाल्यास त्यांच्यावर गुन्हे दाखल करणेबाबत. | शासन परिपत्रक दि. १८ एप्रिल २०१७ मधील मुद्दा क्रमांक २ मध्ये त्याप्रमाणे नमुद करण्यात आलेली आहे. संबधिता विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ व भारतीय दंड विधान संहिता अन्वये कारवाई करण्यात येते. |
| ३ | दारुची नशा करुन महिलांवर अन्याय, अत्याचार केला या संबंधाने ग्रामरक्षक दलाने पोलीस निरीक्षकांना कळविल्या नंतर नशा असेपर्यंत त्यांना ताब्यात घेऊन कायद्याप्रमाणे त्यांच्यावर गुन्हे दाखल करावेत अशा गुन्हयांमध्ये त्यांना सजेची तरतुद नमुद करणेबाबत | संबंधिता विरुध्द त्वरित कारवाई करणे बाबत दि. १८ एप्रिल, २०१७ मधील परिपत्रकात नमुद करण्यात आलेले आहे. महिलांवरील अन्याय व अत्याचारांबाबत भारतीय दंडविधान संहितेमधील कलामान्वये गुन्हे दाखल केले जातात. उक्त गुन्हयांच्या शिक्षेची तरतुद सदर कायद्यात नमुद केलेली आहे. शिक्षेच्या तरतुदीबाबत पुस्तकेत नमूद करण्यात आलेले आहे. |
| ४ | दारुची भट्टी चालवणारा किंवा दारु पिऊन तीन गुन्हे दाखल झाले असल्यास अशा गुन्हेगारांना हद्दपारीचे प्रकरण करुन पोलीस | ही बाब शासन परिपत्रक दि. १८ एप्रिल २०१७ मधील मुद्दा क्रमांक ४ मध्ये नमूद करण्यात आलेली आहे. कालमर्यादेत प्रस्ताव सादर न |

| | | |
|---|---|---|
| | उपअधीक्षकांकडे पाठविणेबाबत उप जिल्हादंडाधिकाऱ्यांनी वेळेत हद्दपारीच्या प्रकरणाला मंजूरी देणेबाबत तरतुदी | केल्यास त्यांच्या कर्तव्य कसुरीबाबत प्रशासकीय कारवाई करावी असे नमुद केले आहे. तसेच दि.१ मार्च, २०१७ च्या परिपत्रकामधील मुद्दा क्र.११ मध्ये प्रकरणे दीर्घकाल प्रलंबित राहिल्यास संबंधिता विरुध्द जिल्हादंडाधिकारी यांनी प्रशासकीय कार्यवाही करावी असे नमुद केले आहे. |
| ५ | पोलीस निरीक्षक किंवा उपजिल्हा-दंडाधिकारी ठरवून दिलेल्या वेळेत कार्यवाही करीत नसतील तर त्यांच्यावर शिस्तभंगाच्या कार्यवाही करणेबाबत तरतुदी | वरील प्रमाणे |
| ६ | पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात ग्रामरक्षक दलाने वेळोवेळी केलेल्या तक्रारीचा दारुबंदी समित्यांनी आढावा घेऊन तक्रारी बाबत संबंधितांनी कार्यवाही करणेबाबत | ही बाब शासन परिपत्रक दि. १ मार्च २०१७ मधील मुद्दा क्रमांक ९ मध्ये नमूद करण्यात आलेली आहे. |
| ७ | ज्या हॉटेलमध्ये अवैध दारु विक्री करणारे किंवा शासकीय परवाना नसताना दारु विक्री करणारे सापडतील किंवा परवाना नसताना दारु पिणारे लोक सापडतील त्या हॉटेल मालकावर गुन्हा दाखल करण्यात येईल. हॉटेलचा परवाना कायमचा रद्द करणेबाबत. | महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ मधील कलम ६८ अन्वये सार्वजनिक दारुचा गुत्ता चालविण्या विरुध्द शिक्षेची तरतुद नमुद केलेली आहे. हॉटेल परवाना रद्द करण्याबाबत संबंधित विभागास कळविण्यात येईल. |
| ८ | ग्रामरक्षक दलाची निवड करण्यासाठी जी महिलांची विशेष ग्रामसभा बोलाविली जाईल, त्या ग्रामसभेमध्ये किमान किती टक्के महिला मतदार उपस्थित असणे आवश्यक आहे. | किमान २५% महिला मतदार उपस्थित असणे आवश्यक आहे. तशी तरतुद महाराष्ट्र ग्रामरक्षक दल ( १ ली सुधारणा ) नियम, २०१७ मध्ये करण्यात आलेली आहे. |
| ९ | दारुभट्टी चालविणाऱ्यांना पहिल्या गुन्ह्यामध्ये कायद्याप्रमाणे किती सजा, दुसरा गुन्हा झाला तर किती सजा, तिसरा गुन्हा झाला तर किती सजा, महिलांवर होणाऱ्या अत्याचाराचे पुरावे मिळाले तर अशा गुन्हेगाराला किती सजा आहे. | महाराष्ट्र दारूबंदी कायदा, १९४९ व भारतीय दंडविधान संहितेमधील शिक्षेच्या तरतुदी आहेत. या पुस्तिकेत स्वतंत्र पृष्ठावर तरतुदी नमुद केलेल्या आहेत. |
| १० | एखाद्या गावामध्ये नवीन दारु दुकान परवाना द्यावयाचा असेल तर त्या गावच्या ग्राम सभेची मान्यता असल्याशिवाय परवाना देण्यात येणार नाही. काही वेळेला | गावामध्ये मद्य विक्रीचे दुकान स्थलांतर होणार असल्यास नियमात ग्रामसभेच्या ठराव घेण्याची तरतुद केलेली आहे. तशी तरतुद महाराष्ट्र देशी दारु नियमावली, १९७३ मधील |

| | | |
|---|---|---|
| | ग्रामपंचायत ना-हरकत प्रमाणपत्रावर दारु दुकान परवाना दिला जातो. त्याबाबत स्पष्टीकरण असावे. | नियम २५ (डी) (iii) मध्ये करण्यात आलेली आहे. |
| ११ | अवैध दारुची व्याख्या फक्त हातभट्टीची दारु अशी न लावता शासकीय परवान्याशिवांय केलेल्या दारु व्यवसाय, ती कोणतीही दारु असो असा आहे का ? | होय. महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ मधील कलम २ (२२), मध्ये निषेधित वस्तुची व्याख्या व २ (२४) मध्ये मद्याची व्याख्या नमुद केलेली आहे. तसेच कलम ६५ मध्ये शिक्षेच्या तरतुदी नमुद केलेल्या आहेत. परवान्याखेरीज मद्य तयार करणे, विक्री करणे, बाळगणे हा गुन्हा आहे. त्यामध्ये सर्व प्रकारच्या मद्याचा समावेश आहे. |
| १२ | दारु धंद्यावाल्यांची नागरिकांने तक्रार केली असेल तर तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल. | शासन परिपत्रक गृहविभाग दिनांक १ मार्च, २०१७ मधील मुद्दा क्रमांक ६ अन्वये तक्रारदाराचे नांव गुप्त राहील याबाबत आवश्यक ती दक्षता घेण्यात यावी म्हणून निर्देश देण्यात आलेले आहेत. |
| १३ | ज्या अधिकाऱ्यांबद्दल तक्रार असेल अशा अधिकाऱ्यांची चौकशी वरीष्ठ अधिकाऱ्यांने करावी. | शासन परिपत्रक गृह विभाग दिनांक १ मार्च, २०१७ मधील मुद्दा क्रमांक ९ मध्ये ग्रामरक्षक दलाने केलेल्या तक्रारीची दखल न घेतल्यास संबंधित अधिकाऱ्यावर कठोर शिस्तभंग विषयक कारवाई होईल असे नमूद केलेले आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियमावली १९७९ प्रमाणे व सामान्य प्रशासन विभागाच्या निर्णयाप्रमाणे शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येते. |
| १४ | दारु दुकान बंदीसाठी निवडणुक होते. त्यावेळी मतदानाची वेळ किती आहे ? | मतदानाची वेळ सकाळी ८.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत करण्यात आलेली आहे. मतमोजणी त्याच दिवशी सायंकाळी ६.०० वाजता सुरू होईल तशी तरतुद शासन अधिसुचना दि.१८ मे, २०१७ अन्वये करण्यात आलेली आहे. |
| १५ | दारु भट्टी किंवा अवैध दारु धंदा करणाऱ्या सराईत गुन्हेगारांवर योग्य ती कार्यवाही करण्यासाठी पोलीस विभाग, उत्पादन शुल्क विभाग व महसुल विभाग यांनी समन्वयाने अवैध दारु धंद्यांना कसा आळा घालणेबाबत | सदर बाब दिनांक १ मार्च, २०१७ च्या परिपत्रकातील मुद्दा क्रमांक ४ व ५ मध्ये नमूद केलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| १६ | दारुभट्टी पकडली आहे किंवा अवैध दारु संबंधाने पंचनाम्याच्या वेळी ग्रामरक्षक दलाच्या सदस्यांना पंच घेणेबाबत. | ग्रामरक्षक दलाच्या सदस्यांना कायदेशीर कार्यवाहीवेळी कळविल्यानंतर साक्षीदार म्हणून उपस्थित राहणे हे त्यांचे कर्तव्य असेल अशी नियमात तरतुद आहे. |
| १७ | अवैध दारु धंदे, दारुभट्ट्या, दारु पिऊन गुन्हे दाखल करणे या संबंधाने पोलीस खाते, राज्य उत्पादन शुल्क खाते यांच्या जबाबदाऱ्या निश्चित करणेबाबत. | शासन परिपत्रक १ मार्च २०१७ व १८ एप्रिल २०१७ यामध्ये सर्व बाबी नमुद केलेल्या आहेत. उक्त परिपत्रकांचा समावेश पुस्तिकेत आहे. |
| १८ | ग्रामसभेने ग्रामरक्षक दलाची स्थापना केल्यानंतर ग्रामरक्षक दलाची प्रत्यक्षात कार्यवाही किती दिवसांत होईल. | महाराष्ट्र ग्रामरक्षक दल नियमावली, २०१७ मधील नियम ७ (३) मध्ये ग्रामरक्षक दलासाठी निवडलेल्या सदस्यांच्या पूर्व चारित्र्य अहवाल पोलीस ठाण्यातून प्राप्त झाल्यानंतर ग्रामरक्षक दल स्थापनेचे आदेश उपविभागीय दंडाधिकारी काढतील असे नमुद केले आहे. ३० दिवसाच्या आत ग्रामरक्षक दल स्थापन करण्याबाबत शासन परिपत्रक दिनांक ६ जून , २०१७ अन्वये सूचना दिलेल्या आहेत. |
| १९ | ग्राम रक्षक दल स्थापन झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर तहसिलदारांकडून ग्रामरक्षक दलाच्या सदस्यांना ओळखपत्र देणेबाबत. | महाराष्ट्र ग्रामरक्षक दल नियम-२०१७ मधील नियम ७(४) मध्ये ओळखपत्र देण्याबाबत नमुद केले आहे. शासन परिपत्रक दिनांक ६ जून , २०१७ अन्वये १० दिवसांत ओळखपत्र देण्याबाबत तहसिलदारांना सूचना दिलेल्या आहेत. |
| २० | पिण्यासाठी देण्यात येणाऱ्या मद्य परवान्यावर देशी दारुच्या किती बाटल्या बाळगता येतात ? | मद्य सेवन परवान्यावर देशी दारुच्या २ यूनिट (१ यूनिट = १००० मि.ली.) प्रति माह बाळगता येतात. |
| २१ | अवैध मद्य निर्मिती, विक्री व बाळगणे इत्यादी बाबत तक्रार करण्यासाठी दूरध्वनी क्रमांक बाबत. | पोलीस व राज्य उत्पादन शुल्क विभागाचे जिल्हानिहाय दूरध्वनी क्रमांक पुस्तिकेत देण्यात आलेले आहेत. या पुस्तिकेतील पृ.क्र.४६ ते ४८ पहावे. |

## पोलीस व राज्य उत्पादन शुल्क विभागातील जिल्हा कार्यालयांचे दूरध्वनी क्रमांक

| अ.क्र. | जिल्हा | STD कोड | पोलिस विभाग | | राज्य उत्पादन शुल्क विभाग |
|---|---|---|---|---|---|
| | | | दूरध्वनी क्र. | व्हॉट्स ॲप क्र. | दूरध्वनी क्र. |
| 1 | नियंत्रण कक्ष, मुंबई | 22 | 22822631/ 22026636/ 22026680 | 7506777100<br>7506888100 | Toll Free 18008333333<br>WhatsApp 8422001133 |
| 2 | मुंबई शहर | 22 | 22621855 /3054 /5020 ,2263333 | NIL | 22664801 |
| 3 | नवी मुंबई शहर | 22 | 27561099 /27574928 / 27566370 | 8424820665<br>8428820686 | 25320050 |
| 4 | ठाणे शहर | 22 | 25443636/ 3535/ 2828/ 2121/ 5353 | 97697224127<br>9969365100 | |
| 5 | पुणे शहर | 20 | 26126296 /26122880/ 26122202 | 8975283100<br>8975953100 | 26127321 |
| 6 | नागपुर शहर | 712 | 26126296 /26122880/ 26122203 | 8055876773<br>8055472422 | 2565971 |
| 7 | नाशिक शहर | 253 | 26126296/ 26122880/ 26122204 | 9673677731 | 2578635 |
| 8 | अमरावती शहर | 721 | 26126296/ 26122880/ 26122205 | 9923078646<br>9923078696 | 2663410 |
| 9 | औरंगाबाद शहर | 240 | 26126296/ 26122880/ 26122206 | 8390022222<br>7741022222 | 2331060 |
| 10 | सोलापुर शहर | 217 | 26126296/ 26122880/ 26122207 | 9422950003<br>9423880004 | 2312376 |
| 11 | ठाणे विभाग | 22 | 27571503 | 9987178383 | 25328652 |
| 12 | ठाणे ग्रामीण | 22 | 26126296/ 26122880/ 26122208 | 7045100111<br>7045100222 | 25320050 |
| 13 | पालघर | 2525 | 26126296/ 26122880/ 26122209 | 9730811119<br>9730711119 | 02414-228001 |
| 14 | रायगड | 2141 | 26126296/ 26122880/ 26122210 | 7057672227<br>7057362226 | 228001 |
| 15 | रत्नागिरी | 2352 | 26126296/ 26122880/ 26122211 | 8888506181<br>8888905022 | 222403 |
| 16 | सिंधुदुर्ग | 2362 | 26126296/ 26122880/ 26122212 | 8275776213<br>8275776216 | 228839 |
| 17 | कोल्हापुर विभाग | 231 | 2667533 | 9552328383 | 2546027 |
| 18 | कोल्हापुर ग्रामीण | 231 | 26126296/ 26122880/ 26122213 | 9552328383<br>7218038585 | 2546025 |
| 19 | सांगली | 233 | 26126296/ 26122880/ 26122214 | 9730928958<br>7875714883 | 2670876 |
| 20 | सातारा | 2162 | 26126296/ 26122880/ 26122215 | 9011181888 | 222339 |
| 21 | पुणे ग्रामीण | 20 | 26126296/ 26122880/ 26122216 | 9923463100<br>9422405421 | 26127321 |
| 22 | सोलापुर ग्रामीण | 217 | 26126296/ 26122880/ 26122217 | 7264885901<br>7264885902 | 2312376 |
| 23 | नाशिक विभाग | 253 | 2598011 | 8390824837<br>8390829937 | 2319744 |
| 24 | नाशिक ग्रामीण | 253 | 26126296 /26122880/ 26122218 | 8390821952<br>8390822352 | 2578635 |

## पोलीस व राज्य उत्पादन शुल्क विभागातील जिल्हा कार्यालयांचे दूरध्वनी क्रमांक

| अ.क्र. | जिल्हा | STD कोड | पोलिस विभाग | | राज्य उत्पादन शुल्क विभाग |
|---|---|---|---|---|---|
| | | | दूरध्वनी क्र. | व्हॉट्स ॲप क्र. | दूरध्वनी क्र. |
| 25 | जळगाव | 257 | 26126296/ 26122880/ 26122219 | 9422210701<br>9422210702 | 2223713 |
| 26 | धुळे | 2562 | 26126296 /26122880/ 26122220 | 9404153520<br>9404253519 | 241884 |
| 27 | अहमदनगर | 241 | 26126296/ 26122880/ 26122221 | 9665887009<br>9156438088 | 2470860 |
| 28 | नंदुरबार | 2564 | 26126296/ 26122880/ 26122222 | 9405628371<br>9405626315 | 210024 |
| 29 | औरंगाबाद विभाग | 240 | 2334324 | 9527482222<br>9527472222 | 2332747 |
| 30 | औरंगाबाद ग्रामीण | 240 | 26126296/ 26122880/ 26122223 | 9881932222<br>7768932222 | 2331060 |
| 31 | उस्मानाबाद | 2472 | 26126296/ 26122880/ 26122224 | 7588527620<br>7218804000 | 223387 |
| 32 | बीड | 2442 | 26126296/ 26122880/ 26122225 | 7749089102 | 222503 |
| 33 | जालना | 2482 | 26126296/ 26122880 /26122226 | 9604121100<br>9604161100 | 225478 |
| 34 | नांदेड विभाग | 2462 | 251253 | 7798744044<br>83088911222 | 2553554 |
| 35 | नांदेड | 2462 | 26126296/ 26122880/ 26122227 | 8888889255 | 287616 |
| 36 | परभणी | 2452 | 26126296/ 26122880/ 26122228 | 7745852222 | 220373 |
| 37 | लातुर | 2382 | 26126296/ 26122880/ 26122229 | 9227649100 | 245412 |
| 38 | हिंगोली | 2456 | 26126296/ 26122880/ 26122230 | 9158044625<br>9158042489 | 220106 |
| 39 | नागपुर विभाग | 712 | 2561620 | NIL | 2553554 |
| 40 | नागपुर ग्रामीण | 712 | 26126296/ 26122880/ 26122231 | 7758903079<br>7758903075 | 2565971 |
| 41 | वर्धा | 7152 | 26126296/ 26122880/ 26122232 | 8888667812<br>8888338354 | 240163 |
| 42 | भंडारा | 7184 | 26126296/ 26122880/ 26122233 | 9405831100 | 252292 |
| 43 | चंद्रपुर | 7172 | 26126296/ 26122880/ 26122234 | 9404872100 | 250595 |
| 44 | गडचिरोली विभाग | 7132 | 222422/223012 | NIL | NIL |
| 45 | गडचिरोली | 7132 | 26126296/ 26122880/ 26122235 | 9421842302<br>9422150089 | 233607 |
| 46 | गोंदिया | 7182 | 26126296/ 26122880/ 26122236 | 9405831100<br>9405841100 | 233459 |
| 47 | अमरावती विभाग | 721 | 2663256 | 7719985000<br>7719986000 | NIL |
| 48 | अमरावती ग्रामीण | 721 | 26126296/ 26122880/ 26122237 | 7038656541<br>7038622651 | 2663410 |
| 49 | अकोला | 724 | 26126296/ 26122880/ 26122238 | 8805451100<br>8805461100 | 2435092 |

| पोलीस व राज्य उत्पादन शुल्क विभागातील जिल्हा कार्यालयांचे दूरध्वनी क्रमांक | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | जिल्हा | STD कोड | पोलिस विभाग | | राज्य उत्पादन शुल्क विभाग |
| | | | दूरध्वनी क्र. | व्हॉट्स ॲप क्र. | दूरध्वनी क्र. |
| 50 | बुलढाणा | 7262 | 26126296/ 26122880/ 26122239 | 9422880113<br>9422880213 | 242301 |
| 51 | वाशिम | 7252 | 26126296/ 26122880/ 26122240 | 8605126857<br>8605878254 | 233700 |
| 52 | यवतमाळ | 7232 | 26126296/ 26122880/ 26122241 | 7264897772<br>9011899888 | 244256 |
| 53 | रेल्वे विभाग | | | | |
| 54 | मुंबई रेल्वे | 22 | 26126296/ 26122880/ 26122242 | 9833312222 | NIL |
| 55 | पुणे रेल्वे | 20 | 26126296/ 26122880/ 26122243 | 9422327130<br>9422327131 | |
| 56 | नागपुर रेल्वे | 712 | 26126296/ 26122880/ 26122244 | 7798888813 | |